नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५२ * अंक १०७ * | * अकोला * | सोमवार, दिनांक २० ऑक्टोबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## युद्धबंदी झाली, टिकेल काय?

आज दोहा येथे आयोजित केलेल्या शांतता चर्चेमध्ये पाकिस्तान आणि अफगाणिस्तान युद्धविरामावर सहमत झालेले आहेत. तुर्कीएच्या मध्यस्थीने गेले आठवडाभर ही चर्चा सुरु होती. अफगाणिस्तानचे संरक्षण मंत्री मुला मोहम्मद याकूब, प्रतिनिधी मंडळ आणि पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मोहम्मद असिफ यांनी या चर्चेत सहभाग घेतला होता. कतारच्या परराष्ट्र मंत्रालयाने आज सकाळी ही घोषणा केली. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यामध्ये ही चर्चा पार पडून हे युद्ध समाप्त करावे असे ठरल्याचे जे वृत्त आले. ही वार्ता समजल्यानंतर आम्हाला ट्रम्प यांचे नाव आठवले. हे युद्ध थांबवण्यासाठी आपणच प्रयत्न केल्याने ते थांबले आहे असे अजून तरी ट्रम्प बरळलेले नाहीत. याचाच अर्थ राष्ट्रा-राष्ट्रांमधील युद्धे ट्रम्प शिवायही थांबू शकतात, हे सर्वांना आता समजलेच पाहिजे. भारत आणि पाकिस्तान मधील युद्ध आपणच थांबवले असे ५२ वेळा ट्रम्प यांनी सांगितले. आपण जे पत्ते खेळतो त्या पत्त्यांमध्ये ५२ पाने असतात, आता पुन्हा जेव्हा ट्रम्प बोलेल, तेव्हा ते जोकरचे पान असेल आपण त्याची प्रतीक्षा करूया. आजच्या घडीला अफगाणिस्तान हे पाकिस्तानच्या मानाने कमजोर राष्ट्र आहे. पाकिस्तानचे सेना प्रमुख मुनीर भारताबरोबर सदैव लढण्याची भाषा करतात. किती नाही म्हटले तरी पाकिस्तानला अमेरिका आणि चीन या दोघांकडून कसा फायदा उचलावा हे मस्तपैकी माहित आहे. हे मुनीर महाशय तर ट्रम्प यांच्या व्हाईट हाऊस मध्ये अतिशय खास पाहुणे असतात म्हणजे जणू काही हा ट्रम्प यांचा मेव्हणाच आहे अशा थाटात या महाशयांना व्हाईट हाऊस मध्ये खीरखुर्मा खिलवला जातो. अफगाणिस्तान आधीच विविध प्रश्नांच्या भडीमाराने त्रस्त आहे तालिबानने कितीही आव आणला तरी अजून अफगाणिस्तानचे आर्थिक गणित तालिबानी सरकारला जमलेले दिसत नाही. रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेल्या काबुलीवाला या कथेत अफगाणिस्तानचे जे वर्णन आहे, त्यापेक्षा आजचा अफगाणिस्तान एकदमच वेगळा आहे. त्यामुळे या दोन देशांमधील भांडण फारसे पसरणार नाही असा जागतिक समुदायाचा जो कयास होता तो निश्चितच बरोबर होता आणि शेवटी समानधर्मी असल्यामुळे दोघांनाही युद्ध फारसे तापू द्यायचे नव्हते, त्यामुळेच आज युद्ध बंदीचा निर्णय झाला असावा. ही युद्धबंदी तात्पुरती आहे की पुन्हा युद्धबंदीसाठी आहे, की या युद्धबंदीला आणखी काही फाटे फुटतील हे अजून तरी कळलेले नाही. रशिया आणि युक्रेन यांच्या लढाईमध्ये रशिया खूपच वरचढ असला तरी युक्रेनला आंतरराष्ट्रीय समुदायातील बरीच मदत होती. अफगाणिस्तानच्या सरकारला अजून तरी बाहेरून फार मोठी मदत मिळेल असे दिसत नाही त्यामुळे भारताबरोबर जुळवून घेण्याचे त्यांनी ठरवले असावे. काही वर्षांपूर्वी याच अफगाणिस्तान मध्ये भारतीय विमानाचे अपहरण करणाऱ्या पाकड्यांनी अफगाणिस्तानच्याच मदतीने भारत सरकारला कोंडीत पकडले होते. तेव्हा भारताला अपमानास्पद अटी स्वीकारून काही आतंकवाद्यांना सोडावेही लागले होते. आता त्याच अफगाणिस्तानने अगदी विरुद्ध पवित्रा घेतला आहे, पाकिस्तानला म्हणे अफगाणिस्तान मधील आतंकवादी त्रस्त करतात अर्थात असा पाकचा दावा आहे. तो कदाचित खराही असेल परंतु पाकिस्तानने तरी आतापर्यंत दुसरे काय केले आहे. भारताविरुद्ध कारवाया करणाऱ्या किती आतंकवाद्यांना पाकिस्तानने जवळ केले याची यादी फार मोठी आहे. आतापर्यंत त्यांनी जे पेरले, तेच अफगाणिस्तानच्या माध्यमातून उगवलेले आहे. पाकिस्तानला आता तर भीक मागून जगावे लागत आहे, यापूर्वी सुद्धा अनेक वषार्पासून पाकिस्तानचे भीक मागूनच आंदोलन सुरू होते, तेव्हा ती भीक थोड्या तरी सन्मानाने मिळत होती. तसेही पाकिस्तानात लोकशाही सरकार आहे असे सांगण्यात येत असले. तरी पाकिस्तानचे लष्कर एकतर स्वतः राज्य करते किंवा लष्कराचे समर्थन करणारा त्यांनी बसवलेला बाहुला राज्य करतो. पाकिस्तानला सध्या कितीही चणचण असली तरी भारताविरुद्ध आपण केव्हाही लढाई लढू शकतो असा पाकचा ताजा लष्करशहा बरळत आहे. पाकिस्तानच्या पहिल्या लष्कर शहापासून आतापर्यंतच्या इतिहासाकडे नजर टाकल्यास सपाटून मार खाल्ला तरी, 'अभी तो मारा अब मार भला' असे म्हणत प्रत्येकालाच आपला लाजिरवाणा पराभव पहावा लागतो हा इतिहास आहे. भारताविरुद्ध लढण्यासाठी आपली शक्ती वाचवावी म्हणून अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यामध्ये शस्त्रसंधी अथवा युद्ध बंदीचा हा ठराव झाला असावा, असे समजण्यास हरकत नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# रेल्वे स्थानके फुल्ल!

प्लॅटफॉर्म खचाखच भरलेले

२० हजार प्रवाशांनी रस्त्यावर काढली रात्र

दिल्ली, मुंबईतही प्रचंड गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

दिवाळी, छठ पूजा आणि बिहार विधानसभा निवडणुकांमुळे देशातील अनेक रेल्वे स्थानके आणि बसस्थानकांवर उत्तर भारतात जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गर्दी असते.

सर्वात जास्त गर्दी असलेली रेल्वे स्थानके म्हणजे दिल्ली, सुरत आणि सुरतचे उधना स्टेशन. येथे हजारो प्रवासी गाड्यांची वाट पाहत आहेत, परंतु गाड्या भरलेल्या असल्याने त्यांना अडचणी येत आहेत. सुरतमधील हजारो लोक तिकिटे असूनही ट्रेनमध्ये चढू शकत नाहीत. स्टेशनपासून ते निवासी भागात प्रवाशांच्या रांगा लागल्या आहेत. १८ तासांपासून भुकेल्या प्रवाशांना ट्रेनमध्ये जागा मिळत नाहीत.

शनिवारी संध्याकाळी सुरतच्या उधना रेल्वे स्थानकाबाहेर गर्दी जमू लागली. गाड्यांमध्ये जागा न मिळाल्याने काही लोकांनी दोन-तीन वेळा तिकिटे रद्द केली. त्यामुळे स्टेशनबाहेर दोन किलोमीटरपेक्षा जास्त रांगा लागल्या. स्टेशनवर अजूनही प्रवाशांची गर्दी आहे. मुले, महिला आणि वृद्धांना सर्वात जास्त त्रास सहन करावा लागत आहे.



दरम्यान, शनिवारी रात्री रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर पोहोचून प्रवाशांशी संवाद साधला. प्रवाशांच्या सोयीसाठी १२,००० विशेष गाड्या चालवल्या जात असून, प्रवाशांची गैरसोय होणार नसल्याचे ते म्हणाले.

दुसरीकडे, नागपूर हे देशातील मध्यवर्ती स्थानक असून, चारही दिशांना जाणाऱ्या रेल्वेगाड्या येथूनच जातात. या स्थानकावरही प्रवाशांची मोठी गर्दी दिसून येते. मुंबई, पुणे कडून येणाऱ्या गाड्या फुल्ल भरून येत आहेत.

# निवडणूक आयोगाविरोधात १ नोव्हेंबरला मोर्चा

## सर्वपक्षीय विरोधकांचा एल्गार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

राज्यातील मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी आणि बोगस मतदारांची नावे असल्याचा आरोप करत सर्वपक्षीय विरोधी पक्षांनी एकत्रित येऊन निवडणूक आयोगाविरोधात एल्गार पुकारला आहे. या गंभीर त्रुटींविरोधात आवाज उठवण्यासाठी १ नोव्हेंबर रोजी निवडणूक आयोगाविरोधात मुंबईत भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

विरोधकांच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाने नुकतीच निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली होती. या भेटीत विरोधकांनी मतदारयाद्यांमधील त्रुटी आयोगासमोर मांडल्या. मात्र, आपले समाधान झाल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. त्यानंतर आज राज ठाकरे यांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना महाराष्ट्रात ९६ लाख बोगस मतदार असल्याचा मोठा दावा केला.

यानंतर सर्वपक्षीय विरोधकांची शिवसेना भवनात पत्रकार परिषद पार पडली. त्यात निवडणूक आयोगाविरोधात मुंबई मोर्चा काढणार असल्याची घोषणा संजय राऊत यांनी केली.

गेल्या काही दिवसांपासून निवडणूक आयोगाच्या घोटाळ्यांबाबत महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पक्ष एक लढाई लढत आहेत. ही लढाई राहुल गांधींच्या नेतृत्वात दिल्लीत लढतोय. त्यानंतर आता महाराष्ट्रात ही लढाई सुरू झालेली आहे. या लढाईतून काय निष्पन्न होईल याविषयी शंका असल्याचे खासदार राऊत यावेळी म्हणाले.

मोर्चाचे नेतृत्व राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनसे प्रमुख राज ठाकरे, यांच्यासह काँग्रेसचे ज्येष्ठ नेते करतील अशी माहिती यावेळी संजय राऊत यांनी दिली आहे.

# महाराष्ट्रात ९६ लाख खोटे मतदार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईतील गोरेगाव नेस्को ग्राउंडवर आयोजित केलेल्या भव्य मेळाव्यात सत्ताधारी पक्षांवर आणि निवडणूक आयोगावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत.

राज ठाकरे म्हणाले की, या निवडणुकीत ९६ लाख खोटे मतदार महाराष्ट्राच्या यादीत भरले आहेत. मुंबईत ८ ते १० लाख, ठाण्यात ८ लाख, असेच प्रत्येक जिल्ह्यात बोगस मतदार आहेत. १ जुलै रोजी त्यांनी यादी बंद करून टाकली आणि त्यात हा गोंधळ झाल्याचा आरोप त्यांनी केला. अशाप्रकारे निवडणुका होत असतील, तर हा राज्यातील जनतेचा आणि मतदारांचा अपमान आहे, असे ते म्हणाले.



राज ठाकरे म्हणाले की, मॅच फिक्सिंग झालेले आहे, तुम्ही मतदान द्या किंवा नको. मग सांगतात, यांचा एकही आमदार, खासदार निवडून आला नाही. अरे कसा येणार, तुम्ही अगोदरच फि क्स करून ठेवले आहे, अशा शब्दांत त्यांनी हल्ला चढवला.

# जरांगे केवळ मुखवटा..

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

राज्यात मराठा आरक्षणावरून ओबीसी समाज आक्रमक झाला असून, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी मराठा आरक्षणासंदर्भात काढलेल्या शासन आदेशामुळे ओबीसी आरक्षण संपुष्टात आले असून, ओबीसी समाजाची मसलत संपल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

लक्ष्मण हाके यांनी मराठा नेते जरांगेंच्या आडून काही क्रूर मराठा राजकीय नेते आपला हेतू साध्य करत असल्याचा गंभीर आरोप लक्ष्मण हाके यांनी पत्रातून केला आहे. जरांगेंचा सगळा खटाटोप राजकीय आरक्षणासाठी होता, परंतु यामध्ये बळी मात्र ओबीसी आणि भटक्या जातसमूहाचा गेल्याचेही त्यांनी पत्रात म्हटले आहे.

# पुण्याच्या शनिवार वाड्यात नमाज पठन!

## हिंदू संघटना आक्रमक : गोमूत्र शिंपडत केले जागेचे शुद्धीकरण

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :

पुण्यातील शनिवार वाड्यात काही मुस्लिम महिलांनी नमाज पठन केल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या घटनेनंतर भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांच्यासह पतितपावन संघटना आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे.

आता तिथे असलेली मजार काढण्याची मागणी त्यांनी लाऊन धरली आहे. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त वाड्याच्या प्रवेशद्वारावर करण्यात आला आहे.

शनिवारवाडा हा आमच्या विजयाचे प्रतीक आहे. त्यामुळे या ठिकाणी ज्यांनी येऊन नमाज पठण केला आहे, त्या जागेचा शुद्धीकरण आम्ही शिववंदना करून करणार आहोत. असे काम करत असाल तर इथून पुढे खपवून घेतले जाणार नाही. येथे आम्ही आता शिव वंदना करण्यासाठी आम्ही इथे एकत्र आलो आहोत. येथे हिंदू धर्मच चालेल, असे खासदार मेधा कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

पतितपावन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होत शनिवार वाड्याच्या बाहेर घोषणाबाजी केली. 'शनिवारवाडा स्वराज्याचा, नाही कोणाच्या बापाचा', अशी घोषणाबाजी यावेळी कार्यकर्त्यांनी केली. आम्हाला नमाज पठन केल्याच्या ठिकाणी भगवा झेंडा लाऊ द्या, अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली. आम्हाला भगवा झेंडा लाऊ देत नाही? असा संतप्त सवाल महिला कार्यकर्त्यांनी उपस्थित केला.






## विरोधी पक्षाच्या मतांना निवडणूक आयोग किंमत देत नाही : सचिन सावंत




**मुंबई :** राज्यात येत्या काही दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी बोगस मतदानाचा मुद्दा उपस्थित केला आहे. निवडणूक आयोगाकडे विरोधी पक्षाच्या शिष्टमंडळाने याबद्दल तक्रार देखील दाखल केली आहे. आता 1 नोव्हेंबर रोजी मोठा मोर्चा काढण्यात येणार आहे. याविषयी आज पत्रकार परिषद घेत कॉंग्रेस नेते सचिन सावंत यांनी भूमिका मांडली आहे. विरोधी पक्षातील शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील तसेच कॉंग्रेसचे नेते सचिन सावंत, मनसे नेते बाळा नांदगावकर व आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना सचिन सावंत म्हणाले, संविधानाने प्रत्येकाला मताचा अधिकार दिला आहे. तोच अधिकार लोकांच्या हातून काढून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

याचा विरोध देशपातळीवर झाला पाहिजे. महाराष्ट्रातील तमाम विरोधी पक्ष एकत्र आले आहेत, असे सचिन सावंत म्हणाले. पुढे बोलताना सचिन सावंत म्हणाले, विरोधी पक्षांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुख्य अधिकाऱ्यांची, राज्य निवडणूक आयोगाचे अधिकारी यांची भेट घेत घेतली होती. मात्र, विरोधी पक्षाच्या मतांना राज्य निवडणूक आयोग आणि केंद्रीय निवडणूक आयोगाने फार काही किंमत दिलेली दिसत नाही, असे म्हणत त्यांनी यावेळी राहुल गांधी यांनी मतदारांच्या घोटाळ्याबाबत दिलेल्या माहितीचा पुनरुच्चार केला. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या काळात महाराष्ट्रात जवळपास 41लाख मतदार वाढले होते, असे राहुल गांधी यांनी याआधीच सांगितलेले आहे.

## नवी मुंबईत उभारले जाणार
# देशातील सर्वात मोठे रेडिएशन थेरपी केंद्र

■ महासागर प्रतिनिधी
ठाणे, दि. १९ :

कर्करोगावरील उपचार, संशोधन आणि शिक्षणासाठी नवी मुंबईतील टाटा मेमोरियलच्या प्रगत केंद्रात नवीन कॅन्सर केअर इमारतीचे बांधकाम सुरू करण्याची घोषणा आयसीआयसीआय बँक आणि टाटा मेमोरियल सेंटरने केली आहे. बँकेच्या सीएसआर उपक्रमांतर्गत ६२५ कोटी रुपयांच्या योगदानाच्या साहाय्याने हे केंद्र भारतातील सर्वात मोठ्या रेडिएशन थेरपी केंद्रांपैकी एक असणार आहे, अशी माहिती सुत्रांकडून देण्यात आली.




आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीचे भूमीपूजन सोहळा रविवारी पार पडला. यावेळी आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीप कुमार सिन्हा, कार्यकारी संचालक संदीप बत्रा, कार्यकारी संचालक अजय गुप्ता आणि टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता हे यावेळी उपस्थित होते.

तळमजला तसेच दोन बेसमेंट असलेली ११ मजली इमारत ३.४ लाख चौरस फुटांवर बांधली जाणार आहे. यामध्ये १२ अत्याधुनिक लिनियर एक्सीलरेटर्स आणि कर्करोगाशी संबंधित इतर प्रगत उपकरणे असणार आहेत. आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी दरवर्षी ७ हजार २०० रुग्णांना रेडिएशन थेरपीची सोय उपलब्ध करून देणार आहेत.

या अंतर्गत रुग्णांची दोन लाखांहून अधिक रेडिएशन सत्रांची सोय केली जाणार आहे. या व्यतिरिक्त, वर्षभरात २५ हजार नवीन रुग्णांना ओपीडी सल्ला तसेच निदान करण्यास मदत करेल. हे केंद्र २०२७ पर्यंत पूर्ण होणार असल्याची चिन्हे आहेत. आयसीआयसीआय बँकेची सीएसआर शाखा, आयसीआयसीआय फाऊंडेशन फॉर इन्क्लुजिव्ह ग्रोथ, या केंद्राचे बांधकाम आणि एकूणच कामकाजावर देखरेख ठेवणार आहे. या भूमीपूजन सोहळ्या प्रसंगी आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीप कुमार सिन्हा म्हणाले, आयसीआयसीआय फाउंडेशन फॉर इन्क्लुझिव्ह ग्रोथ या आपल्या सीएसआर शाखेद्वारे आयसीआयसीआय बँक आरोग्यसेवा, पर्यावरण संवर्धन, शाश्वत उपजीविका आणि सामुदायिक विकास प्रकल्प या चार संकल्पनांवर काम करत आहे.

देशातील महत्त्वाच्या आरोग्यसेवा पायाभूत सुविधांना बळकटी देण्याच्या आमच्या प्रयत्न आहे. कर्करोग काळजी मोहिमेत टीएमसीसोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. हे केंद्र पूर्ण झाल्यानंतर आणि संपूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी रेडिएशन थेरपीसाठी भारतातील सर्वात मोठ्या केंद्रांपैकी एक असणार आहे.

## कर्मभूमी एक्स्प्रेसमधून तिघे खाली पडले
## दोन युवकांचा मृत्यू, एक जखमी

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १९ :

नाशिक रोड परिसरात शनिवारी रात्री एक भीषण रेल्वे दुर्घटना घडली. मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनसहून बिहारमधील रक्सौलकडे जाणाऱ्या कर्मभूमी एक्स्प्रेस (गाडी क्रमांक 12546) मधून तीन युवक खाली पडले. या अपघातात दोन युवकांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर एक युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कर्मभूमी एक्स्प्रेस (गाडी क्रमांक 12546) ही शनिवारी लोकमान्य टर्मिनसहून बिहारमधील रक्सौलकडे निघाली होती. शनिवारी रात्री 8 वाजून 18 मिनिटांनी ही रेल्वेगाडी नाशिक रोड रेल्वे स्थानकावर न थांबता पुढे गेली. ओढा रेल्वे स्थानकाचे स्टेशन प्रबंधक आकाश यांनी नाशिक रोड रेल्वे प्रशासनाला तीन युवक रेल्वेतून खाली पडल्याची माहिती दिली. माहिती मिळताच नाशिक रोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तिथे दोन युवक मृतावस्थेत, तर एक युवक गंभीर जखमी अवस्थेत आढळला. जखमी युवकाला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही दुर्घटना जेल रोडवरील हनुमान मंदिराजवळील ढिकलेनगर परिसरात किलोमीटर 190/1 ते १९०/3 दरम्यान घडली. प्राथमिक अंदाजानुसार, दिवाळी सणाच्या निमित्ताने उत्तर भारताकडे जाणाऱ्या गाड्यांमध्ये मोठी गर्दी आहे. यामुळे काही प्रवासी रेल्वे डब्याच्या दरवाजाजवळ उभे राहतात. सदरील अपघाग्रस्त युवक देखील दरवाजाजवळ थांबले असावे आणि त्यांचा तोल जाऊन ते खाली पडले असावेत. हे तिघे युवक मुंबईत काम करणारे असून दिवाळीसाठी आपल्या गावी बिहारला जात असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. रेल्वेतून प्रवासी खाली पडल्याचे इतर प्रवाशांच्या लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केला.

## ठाकरे बंधू ठाणे महापालिकेत ७५ चा पार आकडा गाठतील : संजय राऊत



**मुंबई:** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) आणि मनसे युती होणार हे निश्चित मानले जात आहे. ठाणे महापालिका निवडणुकीत दोन्ही भाऊ एकत्र लढतील. तेव्हा त्यांची ताकद दिसेल. ठाण्यात ठाकरे हे ठिकऱ्या उडवतील. ठाण्यात दोन्ही बंधू ७५ चा आकडा पार करतील, असा दावा शिवसेना (ठाकरे) नेते खासदार संजय राऊत यांनी केला. शिवसेना (ठाकरे) आणि मनसे ठाण्यामध्ये एकत्र निवडणूक लढणार आणि सत्तेवर येणार आहोत. आमचा नारा ७५ पार आहे. ते जे म्हणतील त्याच्यापेक्षा आम्ही पाच जास्त सांगू. दोन ठाकरे आहेत. दोन ठाकरे सब पे भारी. यावर चर्चा होत राहील. हा सोबत आहे का? तो सोबत आहे का? पण या क्षणी दोन ठाकरे करणार सगळ्यांच्या ठिकऱ्या उडवतील. जेव्हा दोन भाऊ एकत्र येतील तेव्हा आमची ताकद दिसेल, असे त्यांनी संजय राऊत म्हणाले. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कॉंग्रेस आणि महाविकास आघाडीला नव्या भिडूची गरज नाही, असे वक्तव्य केले. महाविकास आघाडीत मनसेला घ्यायचे असल्यास तो निर्णय दिल्लीतून होईल, असे देखील ते म्हणाले होते. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, अजून मनसेचा प्रस्ताव दिलेलाच नाही. त्यांची कार्य समिती असते. कॉंग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, राज ठाकरे यांच्याकडे चहा प्यायला जाऊ नका आणि नाटक करू नका. भाजपचा रंग भ्रष्टाचाराचा आहे. भाजप भाजपचा राहिला का? सगळे कॉंग्रेस, राष्ट्रवादीवाले भाजपमध्ये आले आहेत. स्वतःची पोरे जन्माला घाला, दुसऱ्यांची पोरे किती वेळ खेळवणार तुम्ही? असे म्हणत त्यांनी आशिष शेलारांवर टीका केली.

## सरकारविरोधात काँग्रेसचे सोमवारी
# पिठले, भाकरी आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

राज्यातील बळीराजावर यावर्षी मोठे संकट ओढवले आहे. शेतकरी उद्ध्वस्त झाला असताना त्याला भरीव पॅकेज व कर्जमाफी देण्याची आवश्यकता होती. परंतु सरकारने जाहीर केलेले पॅकेज अत्यंत तुटपुंजे आहे आणि जे जाहीर केले तेही शेतकऱ्यांना अद्याप मिळालेले नाही. जगाचा पोशिंदा बळीराजावर काळी दिवाळी करण्याची वेळ आहे आणि या परिस्थितीला शेतकरी विरोधी महायुती सरकारच जबाबदार आहे. भाजपा महायुती सरकारचा धिक्कार करण्यासाठी काँग्रेस पक्षाचे नेते सोमवार राज्यभर शेतकऱ्यांसोबत पिठलं, भाकरी व ठेचा खाऊन आंदोलन करणार आहे.

अतिवृष्टीने राज्यातील ३० जिल्ह्यातील ३५० तालुक्यात सर्व वाहून गेले आहे. लाखो एकर शेतीचे नुकसान झाले आहे. हेक्टरी ५० हजार रुपये, जमीन खरडून गेली त्यासाठी हेक्टरी ५ लाख रुपये व कर्जमाफी करण्याची मागणी काँग्रेस पक्षाने लावून धरली होती पण भाजपा महायुती सरकारने जुन्याच योजनांची गोळाबेरीज करून ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले, पण हे पॅकेज फसवे निघाले आहे. शेतकऱ्यांना दिवाळीच्या आधी मदत देण्याचे आश्वासनही फेल गेले असून सरकारचा निषेध करण्यासाठी काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांबरोबर पिठलं भाकर आंदोलन करणार आहे.

## अन्न व औषध प्रशासनाकडू ३ हजार ४८५ दुकानांची तपासणी
## दीड हजार दुकानांना नोटीस, ४८ दुकानांचे परवाने रद्द

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १९ :

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासन विभागामार्फत सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात हाती घेतले आहे. या अभियानांतर्गत आतापर्यंत राज्यात ३ हजार ४८५ अन्न दुकानांची तपासणी करण्यात आली आहे. दीड हजार दुकानांना नोटीस बजावण्यात आली असून ४८ दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तपासणीमध्ये दूध, खवा/मावा, खाद्यतेल, तूप, मिठाई, ड्रायफ्रूट्स, चॉकलेट्स, भगर आणि अन्य अन्नपदार्थांचे एकूण ४ हजार ६७६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. या तपासणीत अनियमितता आढळलेल्या १ हजार ४३१ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली असून ४८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर एका आस्थापनेचा परवाना रद्द करण्यात आला असल्याची माहिती अन्न आणि औषध प्रशासन विभागाने दिली आहे. जनतेला सुरक्षित, दर्जेदार अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, सचिव धीरज कुमार तसेच आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न आणि औषध प्रशासना विभागांमार्फत राज्यात सणासुदीच्या कालावधीत अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान ११ ऑगस्ट २०२५ ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. नागरिकांनीही सणासुदीच्या काळात अन्नपदार्थ खरेदी करताना गुणवत्ता, पॅकिंगवरील माहिती आणि परवाना क्रमांक यांची खात्री करूनच खरेदी करावी. भेसळीबाबत संशय आल्यास जवळच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे.

## बीएसयुपी लाभार्थ्यांना सदनिकांच्या चाव्यांचे वाटप

**मुंबई:** मिरा-भाईंदर महापालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या बीएसयुपी योजनेतील सुमारे ७० हुन अधिक आदिवासी लाभार्थ्यांना सदनिकांच्या चाव्यांचे वाटप शनिवारी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पालिका मुख्यालयात करण्यात आले. पालिकेकडून गेल्या १२ वर्षांपासून राबविण्यात येत असलेली बीएसयूपी योजना अद्यापही संथ गतीने सुरु असल्याने ज्या १६ मजली इमारत क्रमांक ५ चे बांधकाम पूर्ण झालेले आहे त्यातील सदनिका पात्र आदिवासी लाभार्थ्यांना तात्काळ देण्यात याव्यात, अशी आग्रही मागणी आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी पालिकेकडे केली होती. सुरुवातीला या सदनिका दसऱ्याच्या दिवशी ताब्यात घेण्याचा इशारा लाभार्थी आदिवासींकडून देण्यात आला होता. मात्र त्याचा मुहूर्त दिवाळीपर्यंत पुढे ढकलण्यात आला होता.

## ज्यांना बोगस मतदानाचा फायदा झाला ते मोर्चात सहभागी होणार नाहीत : जयंत पाटील



**मुंबई :** राज्यात येत्या काही दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी बोगस मतदानाचा मुद्दा उपस्थित केला आहे. निवडणूक आयोगाकडे विरोधी पक्षाच्या शिष्टमंडळाने याबद्दल तक्रार देखील दाखल केली आहे. आता 1 नोव्हेंबर रोजी मोठा मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील देखील सहभागी होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. आज विरोधी पक्षांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना जयंत पाटील यांनी आपली भूमिका मांडली आहे. ते म्हणाले, ज्यांना बोगस मतदानाचा फायदा होतो, ते या मोर्चात सहभागी होणार नाहीत. आम्ही आयोगातील अधिकाऱ्यांची भेट घेतल्यानंतर निवडणूक आयोगाने जे उत्तर दिले ते समाधानकारक नाही. सत्तेत असलेले नेते जर मोर्चात सहभागी झाले तर त्यांना कोणाची ना नाही, पण ज्यांना बोगस मतदानाचा फायदा होतो ते या मोर्चात सहभागी होणार नाहीत. येत्या 1 तारखेला आमचा मोठा मोर्चा निघेल. या मोर्चात पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार, प्रदेशाध्यक्ष आणि पक्षाचा या मोर्चात सहभाग आणि पाठिंबा असेल, असे जयंत पाटील म्हणाले पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, दुबार मतदार यादी काढण्यासाठी काय कार्यक्रम हाती घेणार, मतदार यादीत ज्यांचे पत्ते नाहीत.

## पडताळणीला टाळाटाळ, विद्यार्थ्याची ब्रिटनमधील नोकरी गमावली
# पुण्यातील नामांकित मॉडर्न कॉलेजचा कारनामा

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १९ :

पुणे शहरातील प्रख्यात प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, शिवाजीनगर हे शिक्षणसंस्थान सध्या गंभीर वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. या महाविद्यालयाने आपल्या माजी विद्यार्थ्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या पडताळणीस टाळाटाळ केल्यामुळे, त्या विद्यार्थ्याची ब्रिटनमधील प्रतिष्ठित कंपनीतील नोकरीची सुवर्णसंधी गमावल्याचा आरोप समोर आला आहे.

प्रेम बिहार्डे या विद्यार्थ्याने २०२० ते २०२४ या कालावधीत मॉडर्न कॉलेजमधून बीबीए पदवी पूर्ण केली. पदवी संपल्यानंतर त्याची ब्रिटनमधील कंपनीत निवड झाली होती. मात्र, त्या कंपनीने नियुक्तीपूर्वी महाविद्यालयाकडून शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी मागितली. संबंधित कंपनीकडून ई-मेलद्वारे अधिकृत विचारणा करण्यात आली होती. परंतु महाविद्यालयाकडून या पडताळणीला कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही, अशी धक्कादायक माहिती प्रेम बिहार्डे यांनी दिली आहे.

बिहार्डे यांनी स्वतः कॉलेजचे विभागप्रमुख, उपप्राचार्य आणि प्राचार्यांशी वारंवार संपर्क साधून प्रमाणपत्र पडताळणीची विनंती केली. मात्र, त्यांना वारंवार विलंब केला गेला आणि शेवटी एका प्राध्यापकाने "वरिष्ठांचा आदेश आहे, प्रमाणपत्र देता येणार नाही" असे सांगितल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. यामागे जातीय भेदभाव झाल्याचा संशय प्रेम बिहार्डे यांनी व्यक्त केला आहे.

या अन्यायाविरुद्ध सर्वात प्रथम आवाज उठवला तो रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात गट) यांनी. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. सचिन भाऊ खरात यांच्या नेतृत्वाखाली या प्रकरणात तत्काळ भूमिका घेण्यात आली. त्यांनी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या शिष्टमंडळात पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजाभाऊ कांबळे, राज्य संघटक फिरोजभाई मुल्ला, आणि पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष राहुल वडमारे यांचा समावेश होता.

या निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, मॉडर्न कॉलेजने जाणूनबुजून शैक्षणिक पडताळणी थांबवली, ज्यामुळे प्रेम बिहार्डे यांना ब्रिटनमधील नोकरी गमवावी लागली. विद्यार्थ्यांवर झालेल्या या अन्यायाची सखोल चौकशी करण्यात यावी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली.

### प्रेम बिऱ्हाडे प्रकरणावरून रोहित पवार आक्रमक



**मुंबई :** पुण्यातील मॉडर्न महाविद्यालय आणि माजी विद्यार्थी प्रेम बिऱ्हाडे यांच्यातील वाद चांगलाच चिघळला आहे. महाविद्यालयाने पडताळणी प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ केल्यामुळे आपली लंडनमधील नोकरी गमावल्याचा गंभीर आरोप प्रेम बिऱ्हाडे या तरुणाने एका व्हिडिओद्वारे सोशल मीडियावर केला आहे. विशेष म्हणजे, महाविद्यालयाच्या प्रशासनाने जातीय भेदभाव करून हे 'व्हेरिफिकेशन' केले नाही, असा थेट आरोप बिऱ्हाडेने केला आहे.या प्रकरणी राजकारणही तापले असून, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांच्यावर कठोर टीका केली आहे. रोहित पवार म्हणाले की, नव्या प्राचार्या मॅडम मनुवादी विचारांच्या दिसत आहेत. मनुवादी खेळ करणे प्राचार्यांना शोभत नाही.

## जळगावात केळी निर्यातीला
## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चालना देणार



■ महासागर प्रतिनिधी,
जळगाव, दि. १९ :

जिल्हा केळी उत्पादनासाठी संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. त्यामुळे येथे केळी निर्यातीसाठी मोठी संधी उपलब्ध असताना, त्यासाठी आवश्यक पर्यावरणीय प्रणाली उभारणे काळाची गरज आहे. त्यादृष्टीने इच्छुकांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरतर्फे मार्गदर्शन आणि संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही नवनिर्वाचित अध्यक्ष रवींद्र माणगांवे यांनी येथे दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरच्या जळगाव जिल्हा शाखेतर्फे नवनिर्वाचित अध्यक्ष रविंद्र माणगांवे यांचे स्वागत तसेच जिल्ह्यातील उद्योग आणि व्यापार वृद्धीविषयक अपेक्षा, मार्गदर्शन आणि चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्या ठिकाणी मार्गदर्शन करताना जळगावमधील केळी निर्यातीला चालना देण्याची गरज मानगावे यांनी व्यक्त केली. जिल्ह्यातील प्रत्येक गावातून किमान पाच व्यक्तींची उद्योग सुरू करण्यासाठी निवड करावी. त्यापैकी एक व्यक्ती जरी यशस्वी उद्योग उभा करू शकली, तरी जिल्ह्यात हजारो नवे उद्योजक निर्माण होऊ शकतील. उद्योग उभारण्यासाठी इच्छुक तरूणांना चेंबरच्या माध्यमातून आवश्यक प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दिले जाईल. देश महासत्ता व्हायचा असेल तर लघु उद्योग आणि उद्योजकांना शासन आणि समाजाने पोषक वातावरण तयार करून द्यावे.

# दिवाळीच्या उत्सवात मुलांचे आरोग्य जपा
## फटाके, धूळ आणि मिठाईतील घटकांतून मुलांना ॲलर्जीचा धोका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :

प्रकाशाचा आणि आनंदाचा सण दिवाळी आता दारात आला आहे. घराघरात स्वच्छतेची लगबग, फटाक्यांचा आवाज आणि गोड पदार्थांची रेलचेल. सगळीकडे सणोत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. पण या जल्लोषात मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यास त्याची किंमत चुकवावी लागू शकते. विशेषतः दम्याने, एक्झिमाने किंवा ॲलर्जीने त्रस्त असलेल्या मुलांसाठी दिवाळीचा काळ थोडा अधिक काळजीचा असतो. दरवर्षी दिवाळीपाठोपाठ डॉक्टरांकडे जाणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.



फटाक्यांच्या धुराचा घातक परिणाम हा दिवाळीत सर्वात घातक ठरतो. असेही गेल्या काही वर्षांपासून प्रदुषणाचा प्रश्न प्रामुख्याने शहरी भागात ऐरणीवर आलेला आहे. त्यातच दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके लावण्यात येत असल्यामुळे लगान मुलांच्या श्वसनाच्या विकाराचे प्रश्न निर्माण होताना दिसतात.फटाक्यांच्या धुरात सल्फर डायऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड्स आणि सूक्ष्म धूळकण यांसारखे रसायन असतात. हे घटक श्वसनाच्या समस्यांना चालना देतात. डॉक्टरांच्या मते, लहान मुलांची फुफ्फुसे अजून विकसित होत असतात, त्यामुळे त्यांना धुरामुळे श्वास घेण्यास त्रास, खोकला किंवा दम्याचा झटका येऊ शकतो. बंद खिडक्या असलेल्या घरांमध्ये हा धूर जास्त साचतो, त्यामुळे घरातील हवा शुद्ध ठेवणे महत्त्वाचे आहे.

दिवाळीपूर्वी घराघरांमध्ये मोठी साफसफाई सुरू होते. शहरी भागात बहुतेक घरात एसी असल्यामुळे असेही खिडक्या दारे बंद असतात. त्यातुनच श्वसनाचा एक वेगळाच मुद्दा अशा घरांमध्ये निर्माण झालेला असतो. याशिवाय दिवाळीत सफसफाई करताना कपाटे, गालिचे, पडदे, जुनी पुस्तके हलवताना धूळ आणि बुरशी हवेत पसरते. त्यामुळे त्वचेवर खाज, लालसरपणा, डोळ्यांची जळजळ किंवा सतत शिंक येणे अशी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे स्वच्छतेदरम्यान घरातील खिडक्या उघड्या ठेवाव्यात, मास्क वापरावा आणि ॲलर्जी असलेल्या मुलांना धूळ असलेल्या ठिकाणी न नेता दुसऱ्या खोलीत ठेवावे, असा सल्ला तज्ज्ञ देतात.

दिवाळीत गोडधोड पदार्थांची रेलचेल असते. परंतु अनेक मिठाई आणि फराळातील घटक ज्यात शेंगदाणे, काजू, बदाम, दूध, तूप किंवा कृत्रिम रंग असतो. एरवी हे पदार्थ आपण मोठ्या प्रमाणात खात नाही. मात्र दिवाळीत हटकून फराळ जोरात केला जातो. काही मुलांमध्ये यामुळे ॲलर्जी निर्माण करू शकतात.

बाहेरून मिठाई घेताना त्यातील घटक तपासणे आवश्यक आहे. त्यामुळे शक्यतो ओळखीचे आणि घरगुती तयार केलेले पदार्थ मुलांना देणे अधिक सुरक्षित ठरते, असा सल्ला बालरोगतज्ज्ञ देतात. दिवाळीचा सण आनंदाचा असला तरी मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने पालकांनाही काही काळजी घेणे आवश्यक असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.शक्यतो फटाक्यांऐवजी दिवे, कंदील, रंगोली आणि पर्यावरणपूरक सजावट वापरा.घरातील हवा स्वच्छ ठेवण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा किंवा एअर प्युरिफायर वापरा.दम्याची औषधे आणि इनहेलर नेहमी सहज उपलब्ध ठेवा.

## शरद पवार गटाचे धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :

अतिवृष्टीने राज्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिवाळीपूर्वी मोठ्या पॅकेजची घोषणा केली. पण दिवाळी आली असतानाही त्याची अंमलबजावणी राज्य शासनाने केलेली नाही याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांना सोबत घेत काळी दिवाळी साजरी करण्यात आली.

हातात फलक, काळी कपडे घालत घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी ही काळी दिवाळी साजरी केली. पक्षाचे जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील, शहराध्यक्ष आर. के. पोवार, सरचिटणीस सुनील देसाई यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी सहभागी झाले होते.

अतिवृष्टीमुळे सोयाबीन, तूर, कापूस, मूग, ऊस, उडीद आदी विविध पिकांचे अतोनात नुकसान झाले. पण आतापर्यंत झालेल्या नुकसानीपैकी निम्म्या हेक्टर वरील पंचनामे अद्यापही बाकी आहेत. ते पूर्ण होण्यासाठी आणखी किती कालावधी लागेल हे माहीत नाही. अतिवृष्टीने काढणीला आलेली पिके वाहून गेली, गोठ्यातील दुभती जनावरं, बैल, शेळ्या, कोंबड्या वाहून गेल्या तरी या सरकारनेही अद्याप मदत दिलेली नाही. अशा परिस्थितीत दिवाळी कशी साजरी करायची या चिंतेत शेतकरी आहे. मात्र, सरकारकडून ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत, त्या निषेधार्थ हे आंदोलन असल्याचे शरद पवार गटाने सांगीतले. यावेळी, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करून नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ७५ हजार रुपये देण्याची आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी, सर्व पिकांना किमान आधारभूत किंमत देणारा कायदा करावा, परतीच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेळेवर करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अतिवृष्टी किंवा इतर नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची भरपाई त्वरित मिळावी, शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा, प्रलंबित जलसिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करावीत, शेती पंचनामे वेळेवर न करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, दिव्यांग शेतकरी, मेंढपाळ आणि मच्छीमार यांच्या विविध मागण्या पूर्ण कराव्यात आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. दिवाळी एक दिवसावर आली असली तरी अद्यापपर्यंत कुठलीच मदत शेतकऱ्यांना मिळाली नसल्याने ही दिवाळी काळी दिवाळी असून ही जिल्हा प्रशासनाच्या समोरच आम्ही साजरी करत असल्याचे सांगत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दारावरच हे आंदोलन केले.

महासागर
●सोमवार,दि.२० ऑक्टोबर २०२५
अकोला
पान ३

# शहरात दिवाळीत खेळ भांडी खरेदी जोमात

**अकोला** : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठेत खरेदीस सुरुवात झाली असून पारंपरिक मातीची खेळ भांडी खरेदी करण्याचा ट्रेंड पाहायला मिळतोय. पूर्वीच्या काळातील संस्कृती जपण्यासाठी आणि मुलांना पारंपरिक खेळांकडे वळवण्यासाठी अनेक पालक अशा भांड्यांची खरेदी करत आहेत.सकाळपासूनच शहरातील बाजारपेठा, मुख्यता भागात या भांड्यांची दुकाने आणि हातगाड्या गजबजलेल्या दिसून येत आहेत. खेळणी स्वरूपात लहान मुलांसाठी बनवलेली ताटं, वाट्या, घमेलं, तांब्या, डबा यासारखी मातीची भांडी मोठ्या संख्येने खरेदी केली जात आहेत. दिवाळीच्या निमित्ताने सजावटीच्या वस्तूंना, पणत्यांना आणि फराळाच्या साहित्याला देखील मोठ्या प्रमणात मागणी वाढली आहे. मात्र, यावर्षी बहुतेक सर्व वस्तूंमध्ये २० ते ३० टक्के पर्यंत दरवाढ झालेली असून यामुळे सर्वसामान्य खरेदीदारांचे बजेट थोडे कोलमडल्याचे पण चित्र दिसत आहे. विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार, 'मागणी वाढल्यामुळे आणि कच्च्या मालाच्या दरवाढीमुळे मातीच्या भांड्यांच्या किंमती थोड्या वाढल्या आहेत. तरीही नागरिकांचा उत्साह कमी झालेला नाही.' अकोल्यातील या पारंपरिक वस्तूंच्या खरेदीमुळे शहरात एक वेगळाच सणासुदीचा उत्साह दिसून येत आहे. दिवाळी केवळ रोषणाईचा सण नसून परंपरा, संस्कृती आणि कुटुंबातील एकोपा याचे प्रतीक असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# नानासाहेबांच्या कार्याची महती व महत्त्व तरुण पिढीला समजावं म्हणून ही अभिवादन सभा:डॉ. संतोष कोरपे

## आधार एनेबल्ट पेमेंट सिस्टीमचा शुभारंभ

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

दि अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अकोला ने लोकनेते स्व नानासाहेब सपकाळ यांची जन्मशताब्दी अभिवादन सभा व ग्राहकांसाठी बँकेच्या आधार याने बेल्ट पेमेंट सिस्टीम सेवेचा शुभारंभ अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते करण्यात आला. तर या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर माजी मंत्री व बँकेच्या संचालक सुभाषराव ठाकरे अकोल्यातील ज्येष्ठ सर्जन सर्जन डॉक्टर नानासाहेब चौधरी निळकंठ सहकारी सूतगिरणीचे अध्यक्ष तथा महाबीज चे संचालक डॉ. रणजीत सपकाळ यांचे उपस्थितीत व अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉक्टर संतोष कुमार कोरपे यांचे अध्यक्षतेत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नानासाहेब हिंगणकर अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे तथा जिल्हा बँकेचे सर्व संचालक यांचे सह नानासाहेब सपकाळ यांचे काळातील ज्येष्ठ नागरिक त्यांचे सहकारी व जिल्ह्यातील गणमान्य सहकार नेते या कार्यक्रमाला उपस्थित होते.

स्वर्गीय नानासाहेब सपकाळ जन्मशताब्दी अभिवादन सभेमध्ये डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी आपल्या प्रास्ताविकात लोकनायक स्व. नानासाहेब सपकाळ यांचा जीवन प्रवास उलगडला. ते म्हणाले, डॉ. सपकाळ यांनी सहकाराची रुजविलेल्या चळवळीत आमच्या तिर्सया पिढीची नाळ जोडली आहे. त्यांच्या ध्येय-धोरणावरच बँकेने यशाचा मोठा पल्ला गा' ठला आहे. त्यांना विधात्याने माणसे जूळिवण्याचे कसब जन्मजातच दिले. मितभाषा तसेच सर्वसामान्यांच्या विकासाची तळमळ त्यांच्यात 'असून भरविली. त्यामुळे विदर्भात सहकारी सूत गिरण्या, बँक, सोसायट्या जोमाने उभ्या झाल्या.





त्याचे फलीत आपण आज पाहता आहात, स्व. नानासाहेब सपकाळ त्यांचं कार्य एवढं मोठं होतं अजूनही स्मरण रूपाने ते आठवतात व तरुण पिढीला त्यांच्या कार्याची महती आणि महत्त्व माहित आहे. त्यांना अभिवादन करणारी ही पहिली सभा त्यांचे लोकनेते पद होतं हे लोकांना माहीत पडते अकोला वाशिम नवे तर त्यांनी महाराष्ट्रातील लोकांचे नेतृत्व केले नानासाहेब सपकाळ कालखंड गाजला या जिल्ह्यात ती म्हणतील ते राजकारणात समाजकारणात त्यांना आपण सर्वांनी मिळून अभिवादन करणे हे आपल्यासाठी आनंदाचा भाग आहे. असे लोक मुळातच मोठे असतात पण ते समाजाच्या लवकर लक्षात येत नाही.

ते २१ वर्षाच्या असताना मॉरिस कॉलेजच्या हिरक महोत्सवी समारंभाचे सेक्रेटरी होते हे खूप कमी लोकांना माहिती आहे. ते जन्मजातच मोठे होते हे यावरून सिद्ध होते. त्यांनी सर्वांसोबत संबंध ठेवले सर्वांसोबत येणे जाणे बसणे उठणे होते परंतु त्यांनी राजकारणाविषयी कधी चर्चा केली नाही.यावेळी स्व. नानासाहेब सपकाळ यांचे समकालीन वयवर्ष ९५ असलेले डॉ. नानासाहेब चौधरी यांनीही त्यांच्या जिवनावर प्रकाश टाकला. चौधरी यांनी स्व. सपकाळ यांची बौध्दिकता देशातच नव्हे तर परदेशातदेखील मानली गेली. समाजकारणातून राजकारण असा त्यांचा यशस्वी प्रवास राहिला, असे डॉ. नानासाहेब चौधरी म्हणाले. माजीमंत्री सुभाष ठाकरे यांनीदेखील स्व. नानासाहेब सपकाळ यांच्या आठवणींना उजाळा दिला.

ते आमच्यासाठीआदर्शच नव्हे तर मोठे समाजधुरक आहेत, अशा शब्दात त्यांनी अभिवादन केले.डॉ. रणजित सपकाळ यांनी स्व. नानासाहेब सपकाळ यांनी उभारलेल्या कापूस आंदोलनातील प्रसंग उभा केला. सहकार क्षेत्रातील नीळकं'ठ सहकारी सूत गिरणीमुळे विदर्भातील कापूस उत्पादक शेतर्कयांची अवस्था पालटवली. येथील तरुणांना रोजगार दिला. परंतु, काही कारणामुळे सूत गिरणी बंद झाली. तथापि, आता सूतगिरणीचा भोंगा लवकरच सुरु होणार असून, विदर्भातील कापूस उत्पादक शेतर्कयांना गतवैभव प्राप्त होऊ शकेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. आमदार रणधीर सावरकर यांनी यावेळी सांगितले. तसेच शासकीय सोयाबीन खरेदीत एकसूत्रता आणली जात असून, शेतर्कयांना हमीभावाची हमी आहे. कापूस खरेदीसाठी सीसीआयच्या केंद्राची संख्या वाढविण्यात येत असून, हमीभावानेच खरेदी केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार अनुप धोत्रे यांनी लोकनेते स्व. नानासाहेब सपकाळ यांना अपेक्षित असलेली ग्रामिणांची उन्नती साधायची जबाबदारी आपणावर आहे. त्यांनी दिलेल्या वाटेवर सहकार मार्गक्रमण करीत असून, यशाचा टप्पा गाठला तथापि, हा बदलत्या काळात पुरेसा नसून, यासा'ठी भरीव प्रयत्नांतून त्यांचे स्वप्न साकार करण्यात यशस्वी झालो तर हेच त्यांना अभिवादन 'रेल, असे प्रतिपादन खासदार अनूप धोत्रे यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन बी.जे.काळे व अपर्णा उके यांनी केले. आभार अनंत वैद्य यांनी मानले.

## थोडक्यात

### केंद्रशाळा कानडीत दिवाळी संवेदनांची उपक्रम

**मूर्तिजापूर** : जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्रशाळा (ता. मुर्तिजापूर) येथे विद्यार्थ्यांना मूल्याधिष्ठित शिक्षण देत सामाजिक जाणीव रुजवण्यासाठी दिवाळी संवेदनांची हा स्तुत्य उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमातून जमा झालेला निधी गरजू व्यक्तींसाठी झटणाऱ्या सेवाभावी संस्थेला देण्यात आला, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर अनोखी दिवाळी साजरी करण्याचा आनंद झळकला. शाळेच्या उच्च श्रेणी मुख्याध्यापिका.लता सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाचा मुख्य उद्देश गरिबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, हा होता. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतः आकाश कंदील निर्मिती आणि पणत्यांची आकर्षक सजावट केली. तयार केलेले हे आकाश कंदील व पणत्या विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. या विक्रीतून जमा झालेला संपूर्ण निधी एक ऊब जाणिवेची या निराधार व गरजूंसाठी कार्यरत असणाऱ्या सेवाभावी संस्थेला देण्यात आला. या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नकळतपणे संवेदनशीलता, श्रमप्रतिष्ठा,राष्ट्रभक्ती, सौजन्यशीलता आणि सर्वधर्म सहिष्णुता यांसारख्या महत्त्वाच्या मूल्यांची रुजवणूक झाली. स्वतःची दिवाळी साजरी करत दुसऱ्यांसाठी काहीतरी करण्याची संधी मिळाल्याचा आनंद प्रत्येक विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता. या उपक्रमाचे उद्घाटन मुर्तिजापूर गटसाधन केंद्राचे गट समन्वयक व केंद्रप्रमुख कैलास सोळंके यांच्या हस्ते केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या दिवशी करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील राठोड यांचे उपक्रमाला सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी शाळेतील शिक्षक संदीप वाकोडे, रूपेश सुर्यवंशी, अमोल गोंडचवर, सौ. मेघना वाडकर, कु. शीतल मदनकार आणि कु. कीर्ती राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल प्रतिक्रिया देताना, कानडीचे सरपंच श्री. उदयसिंग जाधव यांनी दिवाळी संवेदनांची हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी असून, गावासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत व्यक्त केले. तर मुख्याध्यापिका सौ. लता सोळंके यांनी या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व सर्जनशीलतेला वाव मिळाला असून, त्यांच्यात सामाजिक बांधिलकीची भावना रुजल्याचे सांगितले.

### वाल्मीकी समाजाच्या वतीने राज्यमंत्री सारवान यांचे स्वागत

अकोला : राज्यभरातील सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी दौऱ्यावर असलेलेनामदार मुकेश सारवान, (राज्य सफाई कर्मचारी आयोग उपाध्यक्ष, मुंबई मंत्रालय, राज्यमंत्री दर्जा यांचे अकोला शासकीय विश्रामगृह येथे आगमन झाले. यावेळी वाल्मीकी समाजाच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. राज्यमंत्री सारवान यांनी यावेळी सफाई कामगारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी चर्चा केली. त्यांनी अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय अकोला येथील सफाई कामगार सचिन कांतीलाल चावरे यांचे निवेदन स्वीकारले. या निवेदनावर पुढील कार्यवाहीसाठी तात्काळ आदेश निर्गमित करण्याचे आश्वासन त्यांनी सर्व दिलेल्या निवेदनांवर शासनाकडे जाणीव करून देण्यात येईल, असे आश्वासन दिले.

## मातोश्री वृद्धाश्रमात साकारला प्रेमाचा झगमगता दीपोत्सव

### फटाकेमुक्त आनंदाची दिवाळी

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

धनत्रयोदशीचा पावन दिवस, दिवाळीच्या उंबरठ्यावर उभं आयुष्य, आणि मातोश्री वृद्धाश्रमाच्या अंगणात साकारलेलं एक भावस्पर्शी चित्र राष्ट्रसंत विचारसाहित्य संमेलन समिती व राष्ट्रधर्म युवा मंच, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या आठ वर्षांपासून सुरू असलेला ङ्गफटाकेमुक्त आनंदाची दिवाळीङ्घ हा उपक्रम यंदाही वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंदाचा फुलोरा उमलवून गेला. आपलं घर-दार, आपली लेकरं, आपली सावली मागे टाकून जीवनाचा शेवटचा प्रवास करीत असलेल्या या आजी-आजोबांसाठी दिवाळी अनेकदा एकाकीपणाची, अपराधगंडाची ठरते. पण संत तुकडोजी महाराज आणि संत गाडगेबाबा यांच्या मानवतावादी विचारांनी प्रेरित



हा उपक्रम त्यांच्या आयुष्यात नवी आशा जागवतो. 'भुकेल्याला अन्न आणि एकट्याला सहवास' हेच या कार्यामागचं खरं सूत्र.या प्रसंगी प्रा. दादाराव पाथ्रीकर अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य पदाधिकारी श्री. शरदभाऊ वानखडे, समाजसेवक श्री. गजाननभाऊ हरणे, निवृत्त ट्रेझरी ऑफिसर डॉ. पार्थजी गिरी, डॉ. रामेश्वर बरगट, ज्ञानेश्वर साकरकार, पत्रकार अजय डांगे, सचिन माहोकार यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. राष्ट्रधर्म युवा मंच जिल्हाध्यक्ष श्री. चंद्रशेखर साबळे, युवती शाखा अध्यक्षा कु. सुरभी दोडके, ॲड. वैष्णवी हगवणे, डॉ. बबलू तायडे, श्री. राजेश गावंडे, श्री. पडघामोल सर, सुशांत निलखन, गाडगे दादा, टेकाम साहेब, आशिष फोकमारे, श्री. निमजे सर, अंबादास वानखडे, भुजाडे साहेब आदी सामाजिक कार्यकर्त्यांनी दिवाळीच्या या उत्सवाला आत्मीयतेचा रंग भरला.मातोश्री वृद्धाश्रमाचे मुख्य व्यवस्थापक श्री. युवराज गावंडे व संपूर्ण व्यवस्थापन समितीने उपक्रमासाठी केलेल्या सहकार्याबद्दल आयोजकांनी कृतज्ञता व्यक्त केली.ही दिवाळी फटाक्यांच्या आवाजात नव्हे, तर करुणेच्या, आपुलकीच्या आणि सहवासाच्या दीपज्योतीत उजळली. या दिव्य झगमगाटात प्रत्येक वृद्धाश्रमातील चेहऱ्यावर जेव्हा आनंदाची उजळणी दिसली, तेव्हा खरी दिवाळी तिथेच साकारली हे उघड आहे.

## अकोला रेल्वे जंक्शनची नवी ओळख!

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

अकोला जंक्शनच्या (भुसावळ विभाग, मध्य रेल्वे ) इतिहासातील एका अभिमानास्पद दिवसाला आज पूर्ण पाच वर्षे पूर्ण झाली आहेत. या ऐतिहासिक क्षणांमुळे अकोला रेल्वे स्थानकाच्या विकासप्रवासातील हा टप्पा जिल्ह्याच्या गौरवाचा द्योतक ठरला आहे. पाच वर्षांपूव त्या दिवशी दोन अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रमांचे लोकार्पण होऊन अकोला जंक्शनने आपली एक नवी ओळख निर्माण केली होती. एक म्हणजे भव्य राष्ट्रध्वजाचे लोकार्पण आणि १०० फुटी गगनचुंबी भव्य राष्ट्रध्वज स्टेशन परिसरात अभिमानाने फडकवण्यात आला. हा तिरंगा गेल्या पाच वर्षांपासून अकोल्याच्या आकाशात दररोज फडकत असून, देशभक्तीचा अभिमान जागवत आहे. त्याचप्रमाणे भारतीय रेल्वेच्या समृद्ध वारशाचे प्रतीक असलेल्या 'शकुंतला नॅरो गेज लोकोमोटिव्ह ' चे अनावरण करण्यात आले.

## अकोला(पुर्व) मतदार संघातील कोणताही शेतकरी मदतीवाचुन वंचित राहणार नाही

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

अकोला(पुर्व) मतदार संघातील कोणताही शेतकरी मदतीवाचुन वंचित राहणार नाही, जून, जुलै, आगस्ट ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी व पुरामुळे आपत्तीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने आर्थिक मदत करण्यात येत आहे... आमदार रणधीर सावरकर, अकोला जिल्ह्यांमध्ये जून, जुलै, आगस्ट ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी व पुरामुळे आपत्ती उद्भवलेली होती. यामुळे शेतकऱ्यांचे शेतीपिक नुकसान, शेतजमीन खरडून जाणे, विहिरीचे नुकसान, मनुष्य व पशुहानी, घर पडझड, घरातील वस्तू/साहित्य नुकसान, वैयक्तिक तसेच सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले होते. पुरामुळे बाधित / तात्पुरत्या स्थलांतरित कुटुंबांना तातडीची मदत पुरविण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी आमदार रणधीर सावरकरांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांना केली होती,

अकोला पुर्व मतदार संघातील अकोला व अकोट तालुक्यातील नुकसानी बाबतीत अकोला व अकोट चे उपविभागीय अधिकारी, दोन्ही तहसीलदार व कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी इ. पासून तलाठी, मंडळ अधिकारी, क्रुषी सहायक, ग्रामसेवक, अशा सर्व क्षत्रिय अधिकारी यांनी नुकसानीबाबत सर्वेक्षण करणे, पंचनामे करणे याबाबतीत सर्वांसोबत आमदार रणधीर सावरकरांनी सतत बैठकी घेऊन तपशिलावार नुकसान अहवाल स्थानिक प्रशासनाकडून शासनास सादरीकरण्यात आला होता, याबाबतीत सर्व अधिकारी यांच्या प्रति आमदार रणधीर सावरकरांनी आभार व्यक्त केले, या अतिवृष्टी मधे शेतीपिक, शेतजमीन नुकसान तसेच वैयक्तिक व सार्वजनिक मालमत्तेचे झालेले नुकसान विचारात घेऊन शासनाने दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार बाधितांना/ आपदग्रस्तांना विशेष मदत पॅकेज व सवलती देण्याचा निर्णय घेण्यात येवून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात येत आहे.

## सुसंस्कृत समाज निर्मितीत सेवानिवृत्तांची भूमिका महत्त्वाची :डॉ.रामप्रकाश वर्मा




**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

कोणत्याही व्यक्तीच्या सेवानिवृत्तीनंतर नवीन जीवनाला प्रारंभ होतो. सेवानिवृत्तीनंतर आपल्या आवडीनिवडी पूर्ण करण्याची संधी मिळते. त्याचा आनंद घेत असतानाच समृद्ध आणि सुसंस्कृत समाज निर्मितीत महत्त्वाची भूमिका पार पाडावी. सेवानिवृत्तीनंतर आपल्या आचरण आणि व्यवहाराने नवीन पिढी घडविण्यासाठी मार्गदर्शन करता येते, असे प्रतिपादन ज्येष्ठ हिंदी साहित्यीक डॉ. रामप्रकाश वर्मा यांनी केले.या असोसिएशनचे जेष्ठ सदस्य अभियंता मुरलीधर निर्वाण यांनी आपल्या लेखणीतून 'स्वाती नक्षत्र केमोती' हा सुविचार संग्रह पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. स्थानिक जीएस कॉन्व्हेट संभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सत्यनारायण बाहेती होते. यावेळी जेष्ठ सदस्य ९२ वर्षीय भाऊसाहेब जानोरकर, उपाध्यक्ष रामभाऊ बिरकड, सचिव एकनाथा ऊके, मोरेश्वर अंबूलकर,मुरलीधर निर्वाण, कवीमु. ज. मुठाळ, प्रा.किशोर बुटोले उपस्थित होते. यावेळी भाऊसाहेब जानोरकर, प्रा. किशोर बुटोले, मुरलीधर निर्वाण, मु. ज. मुठाळ यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन एकनाथ आंबूलकर तर आभार प्रदर्शन मोरेश्वर आंबूलकर यांनी केले.

## जिल्हा उद्योग केंद्राच्या कर्जबाबत मार्गदर्शन शिबिर

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

अकोट फैल परिसरातील इराणी मोहल्ला येथे जिल्हा उद्योग केंद्राचे मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले. माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिरात जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी प्रसन्न रत्नपारखी उपस्थित होते. रत्नपारखी यांनी यावेळी उपस्थित युवकांना योजनेची माहिती दिली. कर्ज मिळिवण्याकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रांबाबत तांत्रिक मार्गदर्शन केले. माजी उपमहापौर दिवेकर यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. आजच्या काळात शासकीय नोकऱ्या जवळपास अशक्य असून युवकांनी स्वयं रोजगार करावा आणि उद्योग केंद्राच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आर्थिक स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. सलीम ईराणी यांनी हे शिबीर यशस्वी करण्याकरिता परिश्रम घेतली. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने इराणी समाजातील युवक व समाज बांधव उपस्थित होते.

# 'गाव तिथे तलाठी' ही संकल्पना साकार

## अकोला पूर्व मतदारसंघात महसूली कार्यालयांचे जाळे उभारले जाणार

**▪अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

अकोला पूर्व मतदारसंघातील नागरिकांसाठी शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, या मतदारसंघातील एकूण १३ मंडळ अधिकारी कार्यालये आणि ६३ तलाठी कार्यालये मंजूर करण्यात आली आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना महसूलसंबंधी कामांसाठी आता लांब जाण्याची गरज राहणार नाही.

या ऐतिहासिक निर्णयामागे भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रतोद आणि अकोला पूर्वचे आमदार रणधीर भाऊ सावरकर यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न कारणीभूत ठरले आहेत. 'गाव तिथे तलाठी' ही संकल्पना हृदयंगम करत त्यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला आणि अखेर शासनाने ही कार्यालये मंजूर केली आहेत. यामुळे नागरिकांची महसूल कार्यालयांसाठी होणारी अडचण दूर होणार असून, शासन सेवा आता त्यांच्या गावातच उपलब्ध होणार आहे.

मंडळ अधिकारी कार्यालये मंजूर झालेली ठिकाणे (१३):अकोला, कौलखेड, सांगळूद, शिवनी, कापशी, दहीहंडा, बोरगाव मंजू, पळसो बु., घुसर, चोहोट्टा, कुरणखेड, आगर, आणि उगवा.

तलाठी कार्यालये मंजूर झालेली गावे (६३):अकोला, अकोली खुर्द, भौरड, शहनवाजपूर, उमरखेड, उमरी, आपोती, आपातापा, दापुरा, घुसर (भाग १), घुसर (भाग २), मारोडी, चिखलगाव (भाग १), चिखलगाव (भाग २), गोरेगाव बु., गोरेगाव खु., कापशी, म्हैसपूर, चांदूर, कौलखेड, खडकी, मलकापूर, शिवापूर, सोमठाणा, कासमपूर, कौलखेड जहागीर, मजलापूर, म्हैसांग, पळसो बु., पळसो खु., दहिगाव गावंडे, धोतर्डी, गुडधी, खरप, उमरी बाळापूर, बाभुळगाव, डोंगरगाव, शिवनी, शिवर, सोनाळा, येळवण, येवता, निंभोरा, दहीहंडा, हिंगणी, दोनवाडा, वरोडी, म्हातोडी, बोरगाव मंजू (भाग १), बोरगाव मंजू (भाग २), बोरगाव मंजू (भाग ३), बोरगाव मंजू (भाग ४), कंचनपूर, खांबोरा, लोणाग्रा, जवळा बु., आगर (भाग २), शिलोडा, भोड, चांदपूर, सांगवी बु., आणि सांगवी खु. या निर्णयामुळे अकोला पूर्व मतदारसंघातील शेतकरी, महिलांपासून ते सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सर्वांना महसुली सेवा गावाच्या पातळीवरच मिळणार आहेत. उतारे, सातबारा, फेरफार, नोंदीकरण, व इतर कामांसाठी आता तालुक्याच्या ठिकाणी जावे लागणार नाही. या उपक्रमाबद्दल मतदारसंघातील जनतेने आमदार रणधीर भाऊ सावरकर यांचे मनःपूर्वक आभार मानले असून, त्यांच्या लोकाभिमुख व दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाचे कौतुक होत आहे.

ही योजना प्रत्यक्षात आल्यावर अकोला पूर्व मतदारसंघ महसूल सेवा सुलभतेत आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## ओमप्रकाश जांभळे मजुराच्या इलेक्ट्रिक शॉक मृत्यू प्रकरणात ४ जणांवर गुन्हा दाखल

**तेल्हाराः** तालुक्यातील वडगाव रोठे येथे बांधकामावर काम करणाऱ्या ओमप्रकाश जांभळे नामक मजुराचा इलेक्ट्रिक शॉक लागल्याने मृत्यू झाल्याची घटना १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजेदरम्यान घडली होती. या प्रकरणी फिर्यादी केशवराव राजू जांभळे (४०) रा. वसाली ता. संग्रामपूर यांच्या तक्रारीवरून तेल्हारा पोलिसांनी १७ ऑक्टोबर रोजी ४ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.आरोपितांमध्ये वसंत रामभाऊ बारींगे (४५) रा. वडगाव रोठे, शेख नईम शेख करीम (३५) रा. बावनबीर, अतुल गोडबोले (४२) रा. तेल्हारा, विकास घोडिले (३८) रा. तेल्हारा यांचा समावेश आहे. १२ ऑगस्टचे रात्री ८ वाजता फिर्यादीला नितेश बिबेकर याने फोन करून सांगितले की, शेख नईम शेख करीम याने आपल्या गावातील दहा लोकांना मजुरीने स्लॅबचे बांधकाम करण्यासाठी वडगाव रोठे येथे त्याचे सोबत बोलेरो पिकअपमध्ये बसवून घेऊन गेला. सोबत काँक्रीटची मिक्सर मशीन टोईंग करून घेऊन आले होते. त्यांनी दिवसभर काम केल्यावर मिक्सर मशीन लोटत असताना मिक्सर मशीनला जोडणाऱ्या काळ्या रंगाची वायरमधून करंट आल्याने त्याचा करंट सर्वांना लागला. त्यात ओमप्रकाश जांभळे मरण पावला. अशा फिर्यादीच्या तक्रारीवरून तेल्हारा पोलिसांनी कारवाई केली आहे. नमूद आरोपींविरुद्ध तेल्हारा पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६, ३(५) अन्वये गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास ठाणेदार प्रकाश तुनकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली तेल्हारा पोलीस करीत आहेत.

### महापालिका प्रशासन व पोलिसांच्या कार्यप्रणालीचा व्यापाऱ्यांना फटका

## दोनशे किरकोळ विक्रेत्यांसाठी हजारो व्यापाऱ्यांचे नुकसान

### अनुचित प्रकार घडल्यास ना ॲम्बुलन्स ना अग्निशमन दलाची गाडी येऊ शकत - व्यापारी



**अकोला महानगरपालिका प्रशासन व पोलिसांच्या हलगर्जीपणामुळे मार्केट मधील व्यापारी एन दिवाळीच्या तोंडावर आपल्या दुकानात जाऊ शकत नाहीत किंवा दुकानांमध्ये ग्राहक येऊ शकत नाही अशा पद्धतीने दुकानासमोर किरकोळ विक्रेते बसले आहेत त्यामुळे मार्केटमध्ये ग्राहक यायला तयारच नाही यामध्ये सर्वात मोठा फटका तर ज्वेलर्स म्हणजे सोन्याच्या दुकानदारांना बसत आहे पैसा घेऊन सोने घेऊन मार्केटमध्ये येणे हे रिस्क जखमीचे असल्यामुळे मार्केटमधील सोन्याच्या दुकानांमध्ये एन दिवाळी धनतेरसला लोकांनी जाणे टाळले याचा खूप मोठा फटका मार्केट मधील परंपरागत सोनार मंडळींना बसला व त्याचा फायदा बाहेर गावावरून आलेल्या मोठ्या मोठ्या ज्वेलर्स ला होत आहे जे कित्येक वर्षाचे महापालिकेला टॅक्स देत आहेत शहराच्या जडणघडणीमध्ये ज्यांचा वाटा आहे त्यांना मात्र दिवाळीमध्ये व्यापार करता येत नाही याला जबाबदार महापालिका प्रशासन व पोलिस यंत्रणात आहे अशी प्रतिक्रिया व्यापाऱ्यांनी दिली आहे.**

**अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

लक्ष्मीपूजनापूर्वीचा सुटीचा रविवार खरेदीसाठी 'सुवर्णसंधी' ठरला. आज (रविवार, १९ ऑक्टोबर) अकोल्यातील प्रमुख बाजारपेठा ग्राहकांनी अक्षरशः गजबजवून टाकल्या. किराणा बाजाराबरोबर, इलेक्ट्रॉनिक्स, रेडीमेड कपडे, सोने-चांदीबरोबरच फटाके विक्रेत्यांनाही विक्रीचा झपाट्याने ओघ मिळाला. दिवसभरात कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाल्याने व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकले. ग्राहकांच्या चेहऱ्यावर नवे काही खरेदी केल्याचा उत्साह आणि आनंद संचारला होता. मिठाई व फराळाच्या दुकानांत चिवडा, लाडू, करंजी, शंकरपाळे आणि बर्फीची विक्री तेजीत. शहरभर गोडधोडाचा सुगंध दरवळत राहिला.

मोबाईल, एलईडी टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशीन, एअरफ्रायर आणि इतर उपकरणांवर 'नो कॉस्ट ईएमआय' आणि 'कॅशबॅक' ऑफर्समुळे इलेक्ट्रॉनिक्स शोरूममध्ये दिवसभर गर्दी उसळली. 'लोक आता भेटवस्तूसाठीही स्मार्ट गॅजेट्स घेत आहेत,' असं एका विक्रेत्याने सांगितलं. बड्या शोरुम प्रमाणे शहरातील लहान दूकानदार देखील ऑनलाईन पेक्षा स्वतः दरात मोबाईल आणि इतर इलेक्ट्रानिक्स वस्तुंची विक्री करताना दिसले. दिवाळी म्हटलं की फटाक्यांशिवाय सण अपुरा ठरतो. शहरातील फटाके बाजार आज अक्षरशः झगमगाटात न्हाऊन निघाला. लहान मुलांसाठी फुलबाज्या, झिंदे, सुतळी बॉम्ब, तर तरुणांसाठी रॉकेट्स, फाउंटन, आणि लाईट शो फटाके - अशा विविध प्रकारच्या फटाक्यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी झाली. पर्यावरणपूरक फटाके' या नावाखाली नवीन प्रकारांनाही चांगला प्रतिसाद मिळाला. काही सामाजिक संस्थांनी ध्वनीप्रदूषण टाळण्याचं आवाहन केलं. 'मुलांच्या डोळ्यांतला आनंद म्हणजे खरी दिवाळी,' असं एका पालकाने सांगत आपल्या लेकरांसाठी फटाक्यांचे पॅकेट घेतले. कंदील, एलईडी लाईट्स, तोरणं, रांगोळी साहित्य आणि घर सजावटीच्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर खरेदी झाली.

## फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याचे समाजसेवक गजानन हरणे यांचे आवाहन

**अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

दिवाळीच्या उत्सवाचे दिवस जवळ येत असताना बाजारपेठा उजळल्या आहेत. सर्वत्र फटाक्यांची दुकाने लागली असून मुलांच्या उत्साहाला उधाण आलेले दिसते. मात्र, या उत्साहामध्ये प्रदूषण, धोकादायक अपघात व आरोग्याच्या समस्या दडलेल्या आहेत. त्यामुळेच या वर्षीची दिवाळी फटाके मुक्त साजरी करण्याचे आवाहन समाजसेवक गजानन हरणे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.दिवाळी ही प्रकाशाची, आनंदाची आणि ऐक्याची असावी. फटाक्यांच्या धुरामुळे आणि कर्णकर्कश आवाजामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व रुग्ण त्रस्त होतात. आगी लागून अनेकदा जीवित व आर्थिक हानी होते. यामुळे दिवाळीचा खरा आनंद हरवतो, असे मत गजानन हरणे यांनी व्यक्त केले.ते पुढे म्हणाले की, फटाक्यांमुळे वाढणारे प्रदूषण हा गंभीर पर्यावरणीय प्रश्न आहे. या समस्येवर उपाय म्हणून कुटुंबानेच पुढाकार घेत 'फटाके मुक्त परिवार' निर्माण करावा. शाळा, महाविद्यालये व पालकांनी मुलांना प्रबोधन देणे हीच काळाची गरज आहे.गजानन हरणे, समाजसेवक तथा संयोजक निर्भय बनो जनआंदोलन, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे तरुणाईसह सर्व नागरिकांना संदेश दिला की, चला, या दिवाळीत आपण सर्वजण मिळून फटाक्यांच्या धुराऐवजी दिव्यांच्या प्रकाशाने, आवाजाऐवजी हास्यकल्लोळाने, आणि अपव्ययाऐवजी फराळाच्या गोडव्याने खऱ्या अर्थाने आनंदोत्सव साजरा करूया.

## दारू पिण्यास पैसे न दिल्याने मुलाने घेतला बापास चावा!

### भांबेरी येथील घटना; गुन्हा दाखल

**तेल्हारा,दि १९ (प्रतिनिधी) :**

भांबेरी येथील रहिवासी ४० वर्षीय निखिल सुरेश भटकर नामक मद्यपी मुलाने १३ ऑक्टोबर रोजी रात्री वडिलांना दारू पिण्यास पैसे मागितले असता आई व वडिलांनी त्याला पैसे देण्यास नकार दिला. त्याने वडिलांच्या डाव्या डोळ्यावर जोरात थापड मारली व उजव्या हाताच्या मनगटावर दातांनी जोरात चावा घेऊन जखमी केल्याची घटना रात्री ८ वाजे दरम्यान घडली. तक्रारीवरून व वैद्यकीय अहवालावरून तेल्हारा पोलिसांनी१४ ऑक्टोबर रोजी आरोपी मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी गीता सुरेशराव भटकर (६६) रा. भांबेरी यांचा मुलगा निखिल सुरेश भटकर (४०) हा पत्नीसह भांबेरी येथे राहतात. फिर्यादीचा मुलगा दारू पिण्याचे सवयीचा असून तो नेहमी त्यांना दारू पिण्यास पैसे मागतो व न दिल्यास तो त्यांचे सोबत वाद घालतो. घटनेच्या दिवशी १३ ऑक्टोबर रोजी रात्री फिर्यादी व त्यांचे पती व सून असे घरी हजर असताना निखिलने फिर्यादीचे पतीस दारू पिण्यास पैसे मागितले.




फिर्यादीचे पतीने व फिर्यादीने त्यास पैसे देण्यास नकार दिला म्हणून त्याने फिर्यादीचे पतीस डाव्या डोळ्यावर जोरात थापड मारली व उजव्या हाताचे मनगटावर दातांनी जोरात चावा घेऊन जखमी केले व त्याचे पत्नीस सुद्धा लोटून दिले व तुम्ही यानंतर मला दारू पिण्यास पैसे नाही दिले तर जीवाने मारून टाकीन अशी धमकी देऊन शिविगाळ केली. अशा आशयाच्या फिर्यादीच्या तक्रारीवरून व वैद्यकीय अहवालावरून तेल्हारा पोलिसांनी नमूद मद्यपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता ( बीएनएस) २०२३ चे कलम ११८(१), ३५१ (२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक प्रकाश तुनकलवार तुनकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली तेल्हारा पोलीस याप्रकरणी पुढील तपास करीत आहे.दारूच्या व्यसनामुळे अनेक कुटूंब उद्धवस्त होत असल्या मुळे गावागावातून दारू बंदी करण्याची मागणी होत आहे. मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना होणे आवश्यक आहे.

## हल्लेखोरांवर कारवाई करा;पोलीस अधिक्षकाना निवेदन

**अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

बैदपुरा परिसरात खुलेआम गोमांस विक्री होत आहे. या ठिकाणी बजरंग दलाचे कार्यकर्ते पोहोचले असता, एका जमावाने कार्यकर्त्यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. या प्रकरणी 'व्हीडीओ'मध्ये दिसत असलेल्या सर्व हल्लेखोरांवर पोलिस आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवर जीवघेणा हल्ला करण्याचे गुन्हे दाखल करण्यात यावे,अशी मागणी बजरंग दलातर्फे पोलिस अधीक्षकांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. १७ ऑक्टोबर रोजी बजरंगदलाचे कार्यकर्ते महानगर



संयोजक प्रेम आमकर यांच्यासह सिटी कोतवाली पोलीस स्टेशन येथे सकाळी ८ वाजता पोहोचले. यावेळी उपस्थित असलेल्या पोलिसांना त्यांनी सांगितले की बैदपुरा येथे खुलेआम गोमांस विक्रीचे ६ ते ७ दुकानं सुरू आहेत.

तेव्हा १ तासानंतर सिटी कोतवाली पोलीस स्टेशनमधील ५ पोलीस कर्मचारी कार्यवाही करण्याकरिता निघाले व पोलिसांच्या विनंतीवरून गोमांस विक्रीचे दुकान दाखवण्याकरिता बजरंग दलाचे कार्यकते सुद्धात्यांच्यासोबत बैदपुरा येथे गेले, पोलिसयेत असल्याचे पाहून गोमांस विक्रेत्यांनी आपली दुकाने पटापट बंद करण्यास सुरुवात केली, तिथे पोहोचल्यानंतर एका दुकानाच्याखिडकीतून दुकानात गोमास अंदाजे दीड ते दोन क्विंटल त्यामधील काही दोरीला बांधलेले व काही खाली ठेवले दिसून आले.

## ओळखीचे व्यक्ती लुटारू होवू शकत नाहीत!' त्या 'बार अँड हॉटेल' प्रकरणात तिन्ही आरोपींना दिलासा

**अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

बहुचर्चित जय महाकाली हॉटेलमधील खळबळजनक 'अंगठी प्रकरण' ला अखेर न्यायालयाने कायदेशीर वळण दिले असून, अकोला न्यायिक दंडाधिकारी (पाचवे JMFC) यांनी तिन्ही आरोपींना सशर्त जामीन मंजूर केला आहे. या निर्णयात ॲड. शिवम शर्मा यांनी केवळ पुरावे आणि तर्कशुद्धता नव्हे तर 'न्यायालयाचे अधिकार' हे सुद्धा ठळकपणे न्यायालयासमोर मांडले. फिर्यादी किशोर भावराव भोयर (वय ४७, रा. शलगाव, ता. मंगरुळपीर) यांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत १२ ऑक्टोबर रोजी अकोला चखऊ मधील जय महाकाली बार अँड हॉटेलमध्ये लहु विकास रोडे, नेहा लहु रोडे आणि पवन गव्हाणे या आरोपींनी त्यांच्याकडून तीन सोन्याच्या अंगठ्या मारपीट करीत हिसकावून घेतल्याचा आरोप केला होता. पोलिसांनी १३ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली.

ॲड. शिवम शर्मा यांचा ठाम बचाव सुनावणीत ॲड. शर्मा यांनी मांडले की, फिर्यादी व आरोपी हे एकमेकांना पूर्वीपासून वैयक्तिकरित्या ओळखतात आणि हॉटेलमध्ये दोघांनी खऱ्या नावाने प्रवेश करून ओळखपत्र सादर केले. त्यामुळे, 'ओळखीचा माणूस जबरी चोरी करून लुटत नाही, आणि लुटण्याचा हेतू असता तर ते स्वतःचे नाव व ओळख लपवले असते' असा ठोस युक्तिवाद त्यांनी मांडला. त्यांनी पुढे म्हटले की, फिर्यादी स्वतःच त्या रात्री अत्यंत मद्यधुंद अवस्थेत होता, आणि त्यानेच महिलेस नृत्य करण्यास सांगितले व त्यासाठी साठी २ ते ३ हजार रुपये उडवले, पैसे संपल्यावर आपल्या उत्साहाच्या भरात तीन सोन्याच्या अंगठ्या स्वेच्छेने त्या महिलेच्या हाती दिल्या. त्यामुळे 'हिसकावून घेतल्या' असा दावा पूर्णपणे मनगटाचा व गैरवास्तव आहे. न्यायालयाची शंका आणि कायदेशीर उत्तर सुनावणी दरम्यान न्यायालयाने विचारणा केली की, 'गचक्रउ कोर्टाला असा गुन्हा ज्या शिक्षेचा प्रवधान जन्मठेपेपर्यंत आहे, त्यात जामीन मंजूर करण्याचा अधिकार आहे का?' या प्रश्नावर ॲडव्होकेट शिवम शर्मा यांनी त्वरित कायदेशीर संदर्भ देतबॉम्बे उच्च न्यायालयाने 'इशान वसंत देशमुख विरुद्ध महाराष्ट्र राज्य' २०११ अङङ चठ (ऊीळ) १९८ या प्रकरणात केलेल्या निरीक्षणांचा उल्लेख करणे सुद्धा उपयुक्त ठरले. त्यात असे नमूद केले आहे की -'सर्वसाधारणपणे, जेव्हा गुन्ह्यासाठी आजीवन कारावासाची किंवा मृत्यूदंडाची शिक्षा ठरवलेली असते आणि तो गुन्हा सत्र न्यायालयातच विचारणीय असतो.

## आरडीजी महिला महाविद्यालयात दीपावली स्नेहमिलन

**अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

भारतीय सेवा सदनद्वारा संचालित आरडीजी महिला महाविद्यालयात दीपावली हा प्रकाशाचा उत्सव असून जनसामान्यांच्या जीवनामध्ये आनंद आणि तेज पर्व यावे, दीपावलीच्या निमित्ताने अज्ञान आणि दुःखाचा अंधकार नाहीसा होऊन सर्वांना कर्तव्यनिष्ठ राहत आपले उदात्त ध्येय प्राप्तीसाठी बळ मिळावे, सर्व सहकारी एकत्रित येऊन प्रांजळ भावनांनी त्यांचे मनोमिलन व्हावे, हा उदात्त उद्देश ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतीय सेवा सदनचे अध्यक्ष दिलीपराज गोयनका, उपाध्यक्ष रवी गोयनका, उपाध्यक्ष भरत गोयनका, सचिव आलोक गोयनका, प्राचार्य डॉ. चारुशीला रुमाले, उपप्राचार्य डॉ. अंबादास पांडे यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतीय सेवासदनचे माजी अध्यक्ष निरंजनकुमार गोयनका, अध्यक्ष दिलीपराज गोयनका, सौरभ गोयनका, घनश्याम गोयनका आणि भारतीय सेवा सदनाचे सर्व कार्यकारी सदस्य, आजीवन सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल होती. अमृता जोशी आणि त्यांच्या विद्यार्थिनींनी गणेशस्तवन सादर करत कार्यक्रमाचा शुभारंभ केला. तसेच अभिनव नृत्य अकादमीच्या विद्यार्थिनींनी मनोहारी नृत्य सादर केले. आरडीजी ब्युटी अकॅडमीच्या संचालक शिवानी ठाकूर आणि राजकुमार जिवतानी ह्यांच्या विद्यार्थिनींनी भारतीय



संस्कृतीमधील विविधता दर्शवणारे सादरीकरण केले. डॉ. विजय आळशी. प्रा. अनिल निंबाळकर, डॉ. सुमेध सगणे, प्रा. सुमंत अंबुसकर, गोपाल राऊत डॉ. अर्चना अंभोरे, प्रा. देवेंद्र देशमुख, सचिन जाधव, तेजरूप कुलकर्णी आणि त्यांच्या सांगितीक चमूने उपस्थितांचे मने जिंकून घेणारी गीत सादर केली. यामध्ये साथसंगत तबला प्रा. विशाल बावस्कर, हार्मोनियम रवी भांडे ऑर्गन सचिन जाधव, ऑक्टोपॅड अजिंक्य इनामदार, गिटार तेजरूप कुलकर्णी यांनी साथ दिली. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार डॉ. रूपा गुप्ता आणि डॉ. निभा उपाध्याय यांनी केले. तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे संयोजन डॉ. विजय आळशी यांनी केले.

## थोडक्यात

### शालेय क्रीडा स्पर्धामध्ये भिकमचंद खंडेलवाल विद्यालयाच्या खेळाडूंचे सुयश

**अकोला :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा परिषद अकोला तसेच विभागीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये भिकमचंद खंडेलवाल विद्यालयाच्या खेळाडूंनी विविध खेळांमध्ये प्राविण्य प्राप्त करत जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर प्रतिनिधित्व करत गोल्ड, सिल्वर आणि ब्राँझ मेडल प्राप्त केले. या मध्ये किक बॉक्सिंग, बॉक्सिंग, तायक्कांडो, ज्युडो, जिम्नास्टिक, कुस्ती, मैदानी, बुद्धिबळ या खेळांचा समावेश आहे. सदर स्पर्धांमध्ये खालील खेळाडूंनी पदक प्राप्त केले. पार्थ चोपडे, पवन गंगारे, शाश्वत शिरसाट, संकेत टोबरे, प्रतीक येसनपुरे, युवराज बुंदेले, रोहन पांडे, दत्ता नेमाडे, मयुरेश वानखडे, कृष्णा अमृतकर, वंश मांडवगडे, मोहम्मद अयान, प्रथमेश घाटोळे, धनंजय जगताप, नयन सुरवाडे, नयन चिपडे, कृष्णा अमृतकर, वीर वानखडे, गणेश वानखडे, पीयुष शेंडगे, अतुल लेखनार.

### ग्रामीण विकास मंत्रालयाच्या राज्यस्तरीय समितीमध्ये अशोक राणे

बाळापूर : येथील सामाजिक कार्यकर्ते तथा गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अध्यासन समितीचे सदस्य अशोक राणे यांची महाराष्ट्र सरकारने ग्राम विकास मंत्रालयाच्या राज्य स्तरीय अभ्यास समिती मध्ये अशासकीय सदस्य म्हणून निवड केली आहे. नुकतीच ग्राम विकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेख सामाजिक सुधारणा व राज्यातील स्मशानभूमीच्या विशेषतः ग्रामीण भागातील समस्या सोडवण्यासाठी राज्य स्तरीय अभ्यास समितीचे गठन केले आहे. सदर समिती मध्ये आमदार अभिमन्यू पवार (लातूर) आमदार देवेंद्र कोठे (सोलापूर) विधान परिषद सदस्य अमित गोरखे (पुणे) यांच्या सह अशोक राणे यांची निवड झालेली आहे. तसेच गठीत झालेल्या राज्य स्तरीय अभ्यास समिती मध्ये शासनाचे वरिष्ठ अधिकारी, सामाजिक वनीकरण आणि व जिल्हा परिषदेच संबंधित वरिष्ठ अधिकारी यांचा सुध्दा सदस्य म्हणून समावेश असणार आहे.

### सक्षमने वितरित केले कर्णबधिर बालकांना मिष्ठान्न

**अकोला** : दिव्यांग सेवेत सक्रिय असणाऱ्या सक्षम च्या वतीने व महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलनाच्या सौजन्याने दिवाळी पर्वावर कर्णबधिर बालकांना मिष्टान्न वितरित करण्यात आले. सक्षमच्या पदाधिकाऱ्यांनी सक्षमचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या पुढाकारात जठारपेठ परिसरातील एकविरा मल्टीपर्पज फाऊंडेशन द्वारे संचालित कर्णबधीर विद्यालयात उपस्थित होऊन विद्यार्थ्यांनादिवाळी फराळाचे वितरण करीत बालकांशी संवाद साधला. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष सौ सुचिता बनसोड तथा श्रीकांत बनसोड यांनी उपस्थितांचे स्वागत करीत संस्थेच्या एकंदर उपक्रमाची माहिती दिली.

## न्यू इरा हायस्कूलच्या अनुष्का तेलगोटेची राष्ट्रीय स्तरावर निवड

**अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय त्वायकान्डो स्पर्धेमध्ये न्यू इरा हायस्कूल च्या अनुष्का तेलगोटेचा दणदणीत विजय. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून विद्यार्थी स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी सहभागी झालेत.

या स्पर्धेमध्ये अमरावती विभागामधून प्रथम क्रमांक पटकावलेली न्यू इरा हायस्कूल, अकोला ची विद्यार्थिनी अनुष्का तेलगोटे हिने अमरावती विभागाचे नेतृत्व केले. १७ वर्षाखालील वजन गट ४१ मध्ये तिने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक जिंकले तसेच तिची निवड आता राष्ट्रीय स्तरावर झालेली आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा जम्मू कश्मीर येथे पुढील महिन्यात होणार आहेत करिता शाळा



समितीचे अध्यक्ष विश्वनाथजी गद्रे, उपाध्यक्ष जयंत मराठे, सचिव गिरीश गोखले, मुख्याध्यापक महेश ठोके, योगिता मडावी, सुषमा देशमुख, अनंत कुलकर्णी, शुभम सरोदे तसेच सर्व शिक्षक वृंदांनी अनुष्का तेलगोटे आणि तिच्या आई वडिलांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार केला आणि शुभेच्छांचा वर्षाव सुद्धा केला, पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्यात तसेच दहावी वर्गामध्ये शिकणाऱ्या भूषण इंगळे, मोहन गोपनारायण, स्वरूप ढोणे यांनी सुद्धा विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन शाळेचे नाव उज्वल केले त्याबद्दल त्यांचा सुद्धा स्वागत सत्कार करण्यात आला.

## डॉ. पूजा खेतान यांना लायन्स मेडिकल एक्सलन्स अवॉर्ड!

**अकोला** : सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने महानगरात अनेक वर्षापासून सामाजिक व वैद्यकीय सेवा करीत असणाऱ्या फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष नेत्रतज्ञ डॉ पूजा सुमित्रा रमाकांत खेतान यांना प्रतिष्ठेचा लायन्सचा 'मेडिकल एक्सलन्स अवॉर्ड' प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला.पुणे येथे नुकत्याच झालेल्या डिस्ट्रिक्ट ३२३४ डी २ अंतर्गत लायन्स क्लब ऑफ पुणेच्या वतीने आयोजित गौरव सोहळ्यात डॉ पूजा रमाकांत खेतान यांना प्रसिद्ध अभिनेत्री संगीता बिजलानी यांच्या हस्ते व डिस्ट्रिक्ट ३२३४ डी २ चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजेश अग्रवाल यांच्या उपस्थितीत 'मेडिकल एक्सलन्स इन ऑप्थोलमोलॉजी' हा अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ पूजा रमाकांत खेतान त्यांच्या सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने सातत्याने अनेक नेत्ररोग व रोगनिदान शिबिरे आयोजितकरण्यात येत असतात. त्याचप्रमाणे इतर वैद्यकीय व सामाजिक सेवेतही त्या सातत्याने सक्रिय असून अनेक गरजूंना वैद्यकीय सहाय्य व जीवनापयोगी साहित्य प्रदान करीत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना लायन्स क्लब ऑफ पुणे यांनी हा अवॉर्ड देऊन सन्मानित केले.

RNI NO-46973/1986 | Dainik Mahasagar Akola | Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय.नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ | महासागर अकोला | **मालक,मुद्रक प्रकाशक** :श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपुर ४४००१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर कॉम्प्लेक्स, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूहसंपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक:पुरुषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९ (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण : आनंदी क्षणातून निसर्गविनाश

भारतीय समाज हा सण-उत्सवप्रिय समाज म्हणून जगात ओळखला जातो. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक सण हा आनंद, ऐक्य, परंपरा आणि श्रद्धेचे प्रतीक असतो. पण आधुनिक काळात या सणांच्या साजरीकरणात अनेक नव्या प्रथा समाविष्ट झाल्या आहेत, ज्यामुळे निसर्गाच्या आरोग्यावर आणि मानवी जीवनावर गंभीर परिणाम होत आहेत.

त्यातीलच एक म्हणजे फटाक्यांचा अतिरेकी वापर, ज्यामुळे निर्माण होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषण आज आपल्या समाजासाठी चिंतेचा विषय बनला आहे. दिवाळी, नाताळ, नवीन वर्ष, लग्नसोहळे, क्रिकेटमधील विजय किंवा राजकीय कार्यक्रम अशाप्रकारचा कोणताही प्रसंग असो, फटाक्यांच्या आवाजाशिवाय तो अपूर्ण वाटतो. परंतु या काही क्षणांच्या आनंदामागे दडलेले प्रदूषणाचे सत्य आपण वारंवार विसरतो.

फटाक्यांचे उत्पादन हे रासायनिक पदार्थांच्या जटिल मिश्रणावर आधारित असते. पोटॅशियम नायट्रेट, सल्फर, कोळशाची भुकटी, बॅरियम, मॅग्नेशियम, लीड, आर्सेनिक, अॅल्युमिनियम, स्ट्रॉन्शियम यांसारख्या अनेक धातू आणि रासायनिक घटकांचा वापर त्यात केला जातो. हे पदार्थ जळताना हवेमध्ये नायट्रोजन ऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि सूक्ष्म धूलिकण सोडतात.

या प्रदूषक वायूंमुळे वातावरणातील हवा विषारी बनते. विशेषतः PM2.5 आणि PM10 या सूक्ष्मकणांचे प्रमाण फटाक्यांच्या दहनावेळी अनेक पट वाढते. (PM2.5 म्हणजे अतिशय बारीक, आणि PM10 म्हणजे थोडे मोठे कण) हे सूक्ष्मकण इतके लहान असतात की ते थेट फुफ्फुसांमध्ये जाऊन रक्तप्रवाहात मिसळतात, ज्यामुळे श्वसनाचे आजार, दमा, ब्रॉन्कायटिस, फुफ्फुसाचे संक्रमण आणि हृदयविकारांची जोखीम वाढते.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, भारतातील प्रमुख शहरांमध्ये दिवाळीनंतर हवेमधील प्रदूषणाची पातळी नेहमीपेक्षा चार ते पाच पट वाढते. दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये दिवाळीच्या रात्रीनंतर PM2.5 च्या प्रमाणात अत्यंत झपाट्याने वाढ होते.

दिल्लीमध्ये तर AQI (Air Quality Index) गंभीर या श्रेणीत म्हणजे ४००-५०० पर्यंत पोहोचतो. ही परिस्थिती श्वसनास त्रास देणारी आणि जीवघेणी ठरू शकते. हवेमध्ये सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडचे प्रमाण वाढल्यामुळे डोळ्यांत जळजळ, घसा खवखवणे, डोकेदुखी, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे सामान्यपणे दिसून येतात.



फटाक्यांच्या दहनामुळे केवळ वायू प्रदूषणच नाही, तर ध्वनी प्रदूषणही प्रचंड प्रमाणात वाढते. साधारण मानवी कानाला सुरक्षित ध्वनीमर्यादा ७५ डेसिबेल इतकी असते, परंतु फटाक्यांच्या स्फोटावेळी आवाजाची तीव्रता १२० ते १५० डेसिबेलपर्यंत पोहोचते.

अशा तीव्र आवाजामुळे कानातील श्रवणशक्तीवर परिणाम होतो, झोपेच्या गुणवत्तेत घट येते, रक्तदाब वाढतो आणि मानसिक ताण निर्माण होतो. वृद्ध व्यक्ती, लहान मुले आणि रुग्ण यांच्यासाठी हा आवाज विशेषतः त्रासदायक असतो.

पक्षी, प्राणी यांनाही ध्वनी प्रदूषणाचा मोठा फटका बसतो. अनेक पक्षी दिशाभूल होऊन झाडांवरून पडतात, पाळीव प्राण्यांमध्ये भीती आणि अस्वस्थता निर्माण होते, तर वन्यजीवांमध्ये प्रजननाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो.

फटाक्यांचा परिणाम फक्त हवेमध्येच मर्यादित राहत नाही. त्यांचे अवशेष म्हणजे कागदाचे तुकडे, धातूंचे कण, प्लास्टिकचे कवच आणि राख जमिनीवर साचतात. हे सर्व नाल्यांत, पाण्याच्या स्त्रोतांत आणि शेतीच्या जमिनीत मिसळून जमिनीचे आणि जलस्त्रोतांचे प्रदूषण निर्माण करतात.

जड धातूंचे हे अवशेष जमिनीतील पोषक घटकांची हानी करतात, त्यामुळे पीक उत्पादनावरही परिणाम होतो. नद्या आणि तलावांमध्ये मिसळलेले हे रसायन जलीय जीवसृष्टीसाठी घातक ठरते.

फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर तो सामाजिक आणि आर्थिक प्रश्नही आहे. दरवर्षी फटाके फोडताना शेकडो अपघात होतात. मुलांच्या आणि तरुणांच्या हातांना, चेहऱ्यांना व डोळ्यांना गंभीर दुखापती होतात. अनेकांना आयुष्यभरासाठी अपंगत्व येते. या दुर्घटनांमुळे रुग्णालयांवरील भार वाढतो आणि कुटुंबांवर मानसिक व आर्थिक ओझे येते.

प्रदूषणामुळे वाढणाऱ्या आजारांमुळे आरोग्यखर्च वाढतो, कामकाजातील उत्पादकता कमी होते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो.

भारतामध्ये वायू प्रदूषण प्रतिबंधक कायदा, १९८१, ह्यपर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ आणि ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम, २००० यांद्वारे फटाक्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले गेले आहेत.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

सर्वोच्च न्यायालयानेही दिवाळीच्या काळात केवळ ग्रीन फटाके वापरण्याची शिफारस केली आहे. हे ग्रीन फटाके पारंपरिक फटाक्यांपेक्षा सुमारे ३० टक्के कमी प्रदूषण निर्माण करतात. तसेच रात्री १० नंतर फटाके फोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. तथापि, या नियमांचे पालन नागरिकांनी मनापासून केले नाही, तर कायदे कागदावरच राहतील.

यावर उपाय म्हणून जनजागृती आणि जबाबदार वर्तन अत्यंत आवश्यक आहे. सण साजरे करणे हे आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे, पण सण साजरा करताना निसर्गाचा अपमान न करता, पर्यावरणपूरक पद्धती अवलंबणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आपण सणाचा आनंद फटाक्यांशिवायही साजरा करू शकतो.

पारंपरिक दिवे, एलईडी लाइट्स, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि पर्यावरण रक्षणाचे संकल्प यांद्वारे. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थ्यांना फटाक्यांच्या दुष्परिणामांबद्दल शिक्षित केले पाहिजे. माध्यमांनीही याबाबत जबाबदार भूमिका घेत जनतेला जागरूक करणे आवश्यक आहे.

आजचा काळ हा हवामान बदलाचा आणि पर्यावरणीय संकटांचा काळ आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे, पर्जन्यमानात अनिश्चितता वाढली आहे, आणि शुद्ध हवा हे आता लक्झरीसारखे झाले आहे. अशा वेळी काही क्षणांचा आनंद मिळवण्यासाठी आपण आपल्या भविष्याच्या श्वासावर संकट आणू शकत नाही. प्रत्येक नागरिकाने प्रदूषणमुक्त सण साजरा करण्याचा संकल्प केल्यास ही समस्या निश्चितच कमी होईल.

फटाक्यांचा आवाज काही क्षणासाठी आकाश उजळवतो, पण त्याच धुराने आपल्या जीवनाचा प्रकाश मंदावतो. निसर्गाचा आवाज ऐका तो आपल्याला सांगतो की आनंद करा, पण जबाबदारीने. सण साजरा करा, पण प्रदूषण नको. प्रकाश पसरवा, पण निसर्गाच्या श्वासाच्या किंमतीवर नाही.

खरी दिवाळी, खरा आनंद, खरा प्रकाश तोच जो निसर्ग, समाज आणि मानव यांच्या समन्वयातून जन्मतो. चला, या सणासुदीला आपण सर्वांनी मिळून ठरवूया की फटाके नाही, फुलझड्यांऐवजी फुलांची सजावट, धूर नाही तर स्वच्छ हवा, आवाज नाही तर आनंदाचा गजर. कारण सणाचा खरा अर्थ आहे प्रकाशाचा उत्सव आणि तो प्रकाश पर्यावरणपूरक, स्वच्छ आणि शाश्वत असेल, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने उज्ज्वल ठरेल.

# प्रदूषित नद्यांच्या श्रेणीत महाराष्ट्र अव्वल

देशातील नद्या स्थानिक नागरिकांच्या जीवनात महत्वाची भूमिका बजावत असतात.सिंचन, पिण्यायोग्य पाणी, कमी किमतीची वाहतूक व्यवस्था हे सर्व नदी प्रणालीद्वारे प्रदान केले जाते असते.



नद्या देशभरातील लोकांसाठी मोठ्या संख्येने उपजीविका देतात. म्हणून भारतातील सर्व प्रमुख शहरे ही नदीकाठच्या आसपास वसलेली आढळते. नद्यांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. नद्या या केवळ उपभोग्यच नसून संस्कृतीशी नाते निर्माण करणाऱ्या आहे. नद्या कोणत्याही परिसंस्थेच्या आधारस्तंभ असतात. आजमितिला जवळपास प्रत्येक देशातील नद्यांना मोठ्या धोक्यांना सामना करावा लागत आहे.

देशभरातील नद्यांतील वाढत्या प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी देशात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ नॅशनल वॉटर क्वालिटी मॉनिटरिंग प्रोग्राम राबवत असते. या प्रोग्रामा अंतर्गत नद्यांच्या पाण्याचे नमुने गोळा करतात. फिजिओ केमिकल, बॅक्टेरिओलॉजीकल मेटल्स आणि पेस्टिसाइड च्या मापदंडाच्या आधारे नदीच्या पाण्याचे प्रदूषण ठरवतात. यात प्रामुख्याने नदीच्या पाण्याचे ऑक्सीजन चे प्रमाण किती आहे, यावर पाण्याचे प्रदूषण ठरविले जाते. धोकादायक प्रदूषण,अत्याधिक प्रदूषण, मध्यम प्रदूषण, सर्वसाधारण प्रदूषण आणि साधारण प्रदूषण असे पाच प्राधान्यक्रम ठरवले जातात. अलीकडेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशभरातील नदी प्रदूषणाबाबत अहवाल प्रसिद्ध केला.

गतवर्षीच्या तुलनेत देशातील नदी प्रदूषणात किंचित घट झाली आहे. परंतु याच अहवालानुसार, महाराष्ट्रातील ५४ नद्या ह्या सर्वाधिक प्रदूषित श्रेणीत आढळून आल्या आहेत. म्हणजेच देशातील एकूण प्रदूषित नद्यांच्या प्रमाणात महाराष्ट्रातील नद्यांचे प्रमाण हे तीस टक्के एवढे आहे. एकंदरीत महाराष्ट्रासाठी हे चिंतेची बाब आहे. सर्वाधिक प्रदूषित नद्यांमध्ये सातारा जिल्ह्यातील आहे. सर्वसाधारण प्रदूषित नद्यांमध्ये कोयना, कृष्णा, वेण्णा, तर कुरमोडी, पंचगंगा ह्या नद्यांचा समावेश साधारण प्रदूषित नद्यांमध्ये होतो.

पृथ्वीवरील वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणामाने पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. नैसर्गिक साधन संपत्तीत अक्षम्य व अमर्याद मानवी हस्तक्षेप वाढल्यामुळे पर्यावरणीय संस्था प्रदूषित होत आहे. नद्यांचे प्रदूषण हे त्याचे ठळक उदाहरण होय. जिथे नद्यांना माता म्हणून संबोधले जाते तेथीलच नद्या ह्या मानवाच्या हलगर्जी पणामुळे आज गटारगंगा होत असताना दिसतात. प्रत्यक्ष व प्रत्यक्ष मागानें होणाऱ्या नदीचे प्रदूषण रोखणे आद्य गरज आहे. करिता आपल्या सर्वांची इच्छाशक्ती असली पाहिजे. जणू हे काळाची गरज आहे. याचे भान अत्यावश्यक ठरते.

आज देशातील सर्व राज्य नदी संवर्धन योजना राबवत असतील,त्याकरिता हजारो कोटींची तरतूद केली जाते. मात्र ती योजना कागदावरच राहते. प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली असती तर नद्यांचे चित्र काहीसे वेगळे बघायला मिळाले असते.वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या अहवालातून हे स्पष्ट होते की, देशातील नद्या मरणासन्न अवस्थेत आहेत.

आज सामान्य नागरिकाला नद्यांची दुर्दशा सहजपणे सांगता येते, अनुभवता सुद्धा येते. काही स्वयंसेवी संस्था नदी संवर्धनासाठी पुढे येत आहे, जनजागृती वाढत आहे. बहुतांश ठिकाणी नागरिकांचे सहकार्यही मिळत आहे.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

आज नद्यांचे रूपडे पालटण्यासाठी राज्यकर्त्यांनी आणि प्रशासनाने कमालीची इच्छाशक्ती दाखवावी लागणार आहे. नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी व नदी संवर्धनात येणारे अडथळे रोखण्यासाठी राज्यकर्त्यांना कायदेशीर कठोर निर्णय घ्यावे लागतील. तरच नद्यांचे अस्तित्व अबाधित राहील आणि नद्या निर्मळ ठेवण्यास मदत मिळेल.

■ ■ ■

# एक कोटी झाडे लावणाऱ्या हिरोची कहाणी!

गोग्रीन नावाखाली आपण ५-१० झाडं किंवा फार तर २० झाडं लावली असतील. पण एका व्यक्तीने, एकट्याने एक कोटीं पेक्षा जास्त झाडे लावली आहेत. कोण आहे ही व्यक्ती?

एक चांगला शिकला सवरलेला माणूस, निसर्गाच्या रक्षणाचा ध्यास घेतलेला माणूस, निसर्गाचे महत्व कळलेला माणूस. पण सर्वज्ञात नसलेला अत्यंत साधा माणूस.सायकलवर फेरी मारायची, त्यामुळे कसलाही खर्च नाही. बिया देण्याचं काम झाडेच करतात. फक्त साठवायच्या आणि वेळ मिळाला की पेरून यायच्या.

हे मोठ्ठ काम ह्या व्यक्तीने हाती घेतलं पण कुठेही बोभाटा न करता.गावातल्या काही लोकांना ह्या माणसाच्या वेड्या छंदाची माहिती होती. काही लोक वेडा माणूस म्हणायचे, उगाच वेळ वाया घालवतोय म्हणायचे. पण ह्याचे काम चालूच. ध्यासच घेतला होता जणू..! या अवलीयाचं नाव आहे दरीपल्ली रामय्या.

तेलंगणा राज्यातल्या खंमम जिल्ह्यातला हा रहिवासी. फक्त त्याच्याच गावातल्या लोकांना त्याची ही करामत माहिती आहे. म्हणून काही लोक त्याला चेटला रामय्या असे संबोधतात. चेट्ठ म्हणजे झाड. (तेलगू भाषेत) म्हणून हा झाडं वाला रामय्या झाला. आता सगळे त्याला ह्याच नावानं ओळखतात.

हा रामैय्या नुसत्या बिया पेरत नाही तर, त्या बियांची रोपंही तयार करतो. त्याने त्याच्या विभागाच्या नगर सेवकाला झाडांचे महत्व पटवून दिले. त्या नगरसेवकाच्या मदतीने रामय्याने खंमम जिल्ह्यातील एक कॅनॉल निवडला. चार किलोमीटरच्या परिसरात कॅनॉलच्या दोन्ही बाजूने अनेक वृक्षांची



पूर्वार्ध

उभारणी केली. रामय्या नुसती झाडे लावून थांबत नाही तर, त्या झाडांची वाढ होईपर्यंत त्यांची काळजी स्वतः सायकलवर फिरून घेतो. एखाद्या लहान मुलाला वाढवावं तसं त्या रोपांना वाढवतो. मोठी झालेली झाडं काही दिवसांत मोठे वृक्षही होतील.

कोण कोणत्या प्रकारचे आहेत हे वृक्ष? रामय्यांनी लावलेल्या झाडांत असंख्य प्रकारचे वृक्ष आहेत. बेल, पिंपळ, कदंब, कडूनिंब, चंदन, रक्त चंदन असे मोठे मोठे वृक्ष रामय्याने लावलेत. त्याचे गाव सगळीकडे हिरवे गार झाले आहे, तेही त्याच्या एकट्याच्या ध्यासातून.

ह्या कामात रामय्यांच्या पत्नीने खूप मदत केली आहे. टिक वृक्षाचं जे बी असतते, ते कठीण कवचाच्या आतमध्ये असते आणि ते फोडून ते बी बाहेर काढावे लागते. एकट्या रामय्याने ते फोडण्याचा प्रयत्न केला पण ते बी मिळवायला वेळ बराच खर्च व्हायला लागला. पण ह्या कवच फोडण्याच्या कामात रामय्यांच्या पत्नीने खूप मदत केली आणि ते काम हलके झाले. कशी? तीही एक गंमत आहे.

रामय्यांची बायको बसून चुलीपुढे स्वयंपाक करायची. त्याला एक कल्पना सुचली. त्याने एका पोत्यात ह्या कवच असलेल्या बिया भरल्या आणि ते आसन तिला बसायला दिले. रोज रोज त्यावर बसून कवच फुटले आणि बिया मिळाल्या! सगळ्यांना प्रश्न पडतो की, रामय्याला या कामातून काय मिळतंय?

रामय्या म्हणतो मला यातून शांती आणि समाधान मिळते म्हणून मी हे करतो. वृक्षो रक्षती रक्षितः म्हणजे वृक्ष त्याचे रक्षण करणाऱ्याचे रक्षण करतात असे स्लोगन त्याने तयार केले आहे.

एवढे करून रामय्या शांत बसत नाही तर, त्याने जिल्ह्यातल्या लायब्ररीतून अनेक वृक्ष लागवडीची माहिती देणारी पुस्तके मिळवली. शास्त्रीय पद्धतीने लागवड कशी करायची ह्याचीही माहिती मिळवली. आता त्यापद्धतीने रोपे तयार करून त्याचे वाटप तो करतो आहे. एवढं करूनही तो थांबत नाही तर त्याने तेलगू भाषेतली काही स्लोगन तयार केली आहेत. ती तो गावातल्या भिंतींवर जनजागृतीसाठी छान रंगांनी रंगवतोय.

याशिवाय तो जुन्या गाड्यांच्या क्लचप्लेट्स आणून पत्र्याचे तुकडे हिरव्या रंगाने रंगवतो. झाडे लावा झाडे जगवा, निसगार्शी नाते जोडा त्यावर असे स्लोगन लिहून जन जागृती करतो आहे. एकदा त्यांच्याच सायकलवरून पडून त्यांचा अपघात झाला. त्यांच्या पायाला जबर मार लागला.पायाचं हाड मोडलं आणि काही महिने त्यांचे बाहेर जाणे बंद झाले. पण त्यांचे काम थांबले नाही.

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

■ ■ ■

## खरा प्रकाशोत्सव : फटाके नाही, दिव्यांचा प्रकाश...

वाचक लिहितात

अज्ञानाच्या अंधःकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा सण म्हणजे दिवाळी! प्रभू श्रीरामांनी रावणाचा पराभव करून चौदा वर्षांच्या वनवासानंतर अयोध्येला परतल्याचा आनंद म्हणून दिवाळी साजरी केली जाते, असे रामायणात सांगितले आहे. दिवाळी म्हणजे प्रकाशाचा उत्सव! दिवे लावून, आनंदाने हा सण साजरा करणे हीच खरी परंपरा आहे.

परंतु आजकाल फटाके फोडल्याशिवाय दिवाळी साजरी होत नाही, असे चित्र दिसते. खरे पाहता, फटाके फोडून सण साजरा करण्याला कोणताही शास्त्रीय अथवा धार्मिक आधार नाही. कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांमुळे आजारी व्यक्ती, वृद्ध आणि नवजात बालके यांना प्रचंड त्रास होतो.

ध्वनीप्रदूषणामुळे डोकेदुखी, रक्तदाब, हृदयविकार यांसारखे विकार वाढतात. फटाक्यांमुळे वातावरणात पसरलेला विषारी धूर आरोग्यास घातक ठरतो. अशा परिस्थितीत फटाके फोडणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा.

याहूनही दुर्दैवी बाब म्हणजे, आज बाजारात श्री लक्ष्मी, श्रीकृष्ण, श्रीविष्णु अशा देवतांची तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळक इत्यादी महान व्यक्तींची चित्रे असलेले फटाके विकले जातात. हे फटाके फोडल्यानंतर त्या चित्रांचे तुकडे रस्त्यावर, नाल्यात किंवा कचऱ्यात पडलेले दिसतात. यामुळे देवतांचा घोर अनादर आणि महापुरुषांचा अपमान होतो.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आपण श्री लक्ष्मीची कृपा मिळवण्यासाठी तिची पूजा करतो, आणि त्याच दिवशी तिचे चित्र असलेले फटाके फोडून तिचाच अनादर करतो. हा किती विरोधाभास आहे. देवतांची चित्रे असलेले फटाके फोडल्यास आपल्यावर देवतेची कृपा होईल कि अवकृपा? देवतांचा अनादर करणे, हे पापच आहे आणि हे पाप आपण प्रतिवर्षी करत असतो.

दरवर्षी देशभरात फटाक्यांवर अब्जावधी रुपयांचा अपव्यय केला जातो, पण त्यातून केवळ प्रदूषण आणि आरोग्याचे नुकसानच होते. त्यामुळे आता बदल घडवण्याची वेळ आली आहे. दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे अंधारावर प्रकाशाचा विजय! या वर्षी आपण फटाक्यांऐवजी दिव्यांच्या प्रकाशाने दिवाळी साजरी करू या. तेव्हाच दिवाळीचा खरा प्रकाशोत्सव साकार होईल!

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

### प्रदूषणकारी फटाके !

वाढते प्रदूषण आणि हवामानातील बदल लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने यंदा केवळ हरित फटाके फोडण्यास अनुमती दिली आहे. असे असले तरी मोठ्या आवाजाचे आणि धुराचे प्रदूषणकारी फटाके दिवाळीच्या आधीपासून सर्रासपणे विकले जात आहेत. फटाके फोडण्यासाठी न्यायालयाने प्रतिवर्षाप्रमाणे याही वेळेस वेळेची मर्यादा आखून दिली आहे; मात्र ती कुठेच पाळली जात नाही हेही तितकेच खरे आहे. मुंबईसारख्या सर्वाधिक प्रदूषित शहरात दिवाळीच्या काळात रात्री १२ वाजल्यानंतरही फटाके फोडले जातात. याकडे पोलीस प्रशासनही कोणाची तक्रार येईपर्यंत सोयीस्करपणे कानाडोळा करते.

मुंबईतील पोलीस वसाहतींमध्ये सुद्धा रात्री उशिरापर्यंत फटाके फोडले जातात. त्यामुळे न्यायालयाच्या या आदेशाला प्रशासन किती गांभीर्याने घेते हेही हे लक्षात येते. फटाक्यांच्या आवाजाच्या मर्यादेबाबतही दरवर्षी नियम घातले जातात मात्र दिवाळीत ही मयार्दाही सर्वत्र बिनदिक्कतपणे ओलांडली जाते. दिवाळीच्या काळात शहरात सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाण फटाके फोडले जात असल्याने प्रशासन तरी कुठे कुठे लक्ष देणार? फटाक्यांमुळे प्रदूषणात वाढ होऊन केवळ माणसाच्याच नव्हे तर पक्षी आणि प्राण्यांच्या आरोग्याचीही अपरिमित हानी होते. फटाके फोडणे म्हणजे केवळ धनाचाच अपव्यय नव्हे, तर फटाक्यांमुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात जैविक आणि वित्तीय हानी होत असते. क्षणिक सुखाव्यतिरिक्त कोणतेही लाभ नसणारी फटाके फोडण्याची प्रथा ही मुळात भारतीय संस्कृतीचाच भाग नाही. दिवाळी आणि फटाके फोडणे यांचा तर तिळमात्र संबंध नाही. मग या विषवल्लीच्या छोट्या छोट्या फांद्या छाटण्यात वेळ घालवण्यापेक्षा प्रदूषणकारी फटाक्यांवर बंदी आणून मुळावरच का घाव घातला जात नाही?

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.

# खऱ्या लोकप्रतिनिधीचा चेहरा : जनतेच्या अश्रूंमध्ये दिसणारा आरसा!

लोकशाही ही जनतेच्या विश्वासावर उभी असते. जनतेचा प्रतिनिधी म्हणजेच लोकप्रतिनिधी हा त्या विश्वासाचा आधारस्तंभ असतो. पण आज प्रश्न असा उभा आहे की, आपण निवडून दिलेला लोकप्रतिनिधी खरोखर जनतेचा आहे का, की फक्त सत्तेचा?

खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी म्हणजे तो जो आपल्या मतदारसंघातील माणसांचे दुःख स्वतःचे दुःख मानतो, त्यांचा आवाज विधानसभेत किंवा संसदेत बुलंद करतो, आणि जनतेच्या डोळ्यांत आशेची ज्योत पेटवतो. लोकप्रतिनिधी हा केवळ निवडणुकीच्या काळात न दिसता, संकटाच्या क्षणी जनतेसोबत उभा राहतो, त्यांच्यासाठी लढतो, त्याग करतो.

आजचे चित्र मात्र काळजाला चटका लावणारे आहे. निवडणूक संपली की जनता विसरली जाते. त्यांचे प्रश्न, त्यांचे अश्रू, त्यांचे हक्क यांची दखल घेतली जात नाही व जनतेचा आवाज दाबला जातो. सत्तेची आसक्तीमुळे काही लोकप्रतिनिधींचा खरा चेहरा सत्ताकेंद्राच्या दालनात दिसतो. तेथे जनतेचे नाही, तर खुर्चीचे राजकारण चालते.

भ्रष्टाचार व स्वार्थामुळे जनतेचे पैसे विकासासाठी खर्च होण्याऐवजी स्वतःच्या संपत्तीसाठी वापरले जातात. जनता अंधारात राहते, पण नेत्यांचे बंगलो उजळून निघतात. संवेदनाहीनतामुळे शेतकरी आत्महत्या करतो, कामगार उपाशी राहतो, महिला अत्याचाराला बळी पडते, तरुण बेरोजगार होतो पण लोकप्रतिनिधींच्या डोळ्यांत पाणी दिसत नाही.

प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

खऱ्या लोकप्रतिनिधीचा चेहरा, खरा लोकप्रतिनिधी म्हणजे जो संकटात जनतेला सोडून पळून जात नाही, तर तिच्या खांद्याला खांदा लावून उभा राहतो, जो मतांसाठी नव्हे, तर माणसांसाठी जगतो, जो स्वतःचे घर नाही, तर मतदारसंघाचे घर उजळवतो आणि जो पक्षापेक्षा प्रामाणिकपणाला आणि सत्तेपेक्षा सेवेला महत्त्व देतो. असा लोकप्रतिनिधी दुर्मीळ झाला आहे. पण जेव्हा कुणी खरा नेता उभा राहतो, तेव्हा जनतेच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहतात, कारण त्यांना वाटते हो, हाच आमचा खरा प्रतिनिधी आहे.

आजची लोकशाही केवळ निवडणुकीपुरती सीमित राहिली आहे. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी लोकांशी असलेली आत्मिक नाळ विसरली आहे. हा चेहरा बदलायला हवा. अन्यथा लोकशाही ही फक्त कागदावरील व्यवस्था राहील, जनतेच्या हृदयातील श्रद्धा नाही.

लोकप्रतिनिधी हे पद नाही, ती जबाबदारी आहे. ते गौरव नाही, तर सेवा आहे. त्यात खोटेपणा असेल तर लोकशाही मरेल; पण जर त्यात प्रामाणिकपणा, त्याग आणि संवेदनशीलता असेल तर लोकशाही जिवंत राहील.

आज जनतेला हवेत भाषण करणारे नेते नव्हेत, तर त्यांच्या डोळ्यांत डोळे घालून, त्यांच्या हातात हात घालून चालणारे खरे लोकप्रतिनिधी. खरा लोकप्रतिनिधी हा केवळ चेहरा नसतो, तो म्हणजे जनतेच्या स्वप्नांचा, आशांचा आणि विश्वासाचा आरसा आणि त्या आरशात जर जनता स्वतःला पाहते, तेव्हाच तो नेता खरा ठरतो.

■ ■ ■

# मिठाईवरील चांदीचा फॉइल मांसाहारी की शाकाहारी?

दिवाळी सणाचा उत्साह ओसंडून वाहतो आहे . विविध वस्तुंच्या खरेदीसोबतच प्रत्येकजण खरेदी करतात ती मिठाईची. जवळपास सर्वच मिठाईंवर फॉईल पेपर लावलेला असतो. त्यामुळे मिठाई आकर्षकही दिसते. मिठाईंना शाही आणि चमकदार स्वरूप येते, त्या लक्झरी भेटवस्तूसारख्या दिसतात.



पण अनेकदा प्रश्न पडतो की हा चांदीचा फॉइल शाकाहारी असतो का? अशा बऱ्याच अफवा आहेत की या चांदीच्या वर्कमध्ये प्राण्यांची चरबी असते. त्यामुळे हे चांदीचे वर्क खाण्यायोग्य असतात का? यामुळे बरेच लोक चांदीच्या फॉइल असलेल्या मिठाई टाळतात.

चांदीचे वर्क हे अतिशय पातळ चांदीचे फॉइल असते. ज्याची जाडी फक्त ०.२ ते ०.८ मायक्रोमीटर असते. ते खाण्यायोग्य असते, पण त्याला विशिष्ट अशी चव नसते.

पूर्वीपासून वर्क बनवण्याची पद्धत अशी होती की बैल, म्हैस, मेंढी किंवा बकरीसारख्या प्राण्यांच्या आतड्यांमध्ये किंवा कातडीमध्ये चांदीचा पातळ पत्रा ठेवला जात असे आणि नंतर तो हातोड्याने मारला जात असे. कारण प्राण्याच्या मऊ त्वचेमुळे चांदी चिकटत नव्हती आणि प्राण्यांच्या चरबीवर ती सहजपणे वेगळी होत असे. तथापि, समस्या अशी होती की आतड्याचा काही भाग चांदीमध्ये मिसळत असे. म्हणून, वर्क मांसाहारी मानला जात असे.

२०१६ मध्ये, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने प्राण्यांच्या अवयवांपासून जसे की आतडे किंवा चामडे यांचा चांदीचे वर्क बनवण्यासाठी वापर करण्यावर पूर्णपणे बंदी घातली. शिवाय ते आरोग्यासाठी देखील हानिकारक होते. दिल्ली सरकारने ते लागू केले, परंतु २०१८ मध्ये, काही उत्पादकांच्या अपिलानंतर दिल्ली उच्च न्यायालयाने बंदी उठवली.

तथापि, न्यायालयाने म्हटले की ही प्रक्रिया स्वच्छ असली पाहिजे. पण आजकाल बहुतेक चांदीचे वर्क हे यंत्राने बनवलेले असतात. त्यात प्राण्यांचे कोणतेही अवयव नसतात. ते पूर्णपणे शाकाहारी असतात

२०२५ पर्यंत, बाजारात उपलब्ध असलेल्या मिठाईंमधील बहुतेक चांदीचे वर्क हे मशीन-निर्मित असल्याचं म्हटलं जातं. त्यात शुद्ध चांदी असते, कागदावर किंवा मशीनमध्ये ते तयार केले जातात.

मोठे ब्रँड आता वर्कला शाकाहारी प्रमाणित असे लेबलही त्या मिठाईच्या बॉक्सवर लावतात. विशेषतः दिवाळीसारख्या सणांमध्ये तर याकडे नक्कीच लक्ष दिलं पाहिजे. सण आणि लोकांच्या भावना दोन्ही महत्त्वाच्या गोष्टी असतात. परंतु, आजकाल प्राण्यांची चरबी असलेले वर्क लावत नाही.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### दीपोत्सव...!

आतेष्टांना खुशाल घाला
तुम्ही आग्रहाने खाऊ
उपाशीपोटी व्यक्तिलाही
भाऊ, दोन घास देऊ..!

देवाने भरपूर दिलय
आपल्याला सर्व काही
दुःखीतांचे आश्रू पुसाया
नका करू हो कुचराई..!

अंधकार मनातील
ज्या दिवशी मिटेल
तोच खरा दिवाळीचा
पावन पर्व असेल..!

## धन्वंतरी पूजनानिमित्त साण्डू फार्मास्युटिकल्सकडून वैद्य पुष्कर नरहर प्रभू यांचा सत्कार

# आयुर्वेद हे केवळ औषधशास्त्र नसून जीवनशैली आहे : शशांक साण्डू

**मुंबई, १९ ऑक्टोबर :** धन्वंतरी जयंती व पूजनाच्या शुभ प्रसंगी साण्डू फार्मास्युटिकल्स लिमिटेड तर्फे आयोजित विशेष कार्यक्रमात आयुर्वेद क्षेत्रातील नामवंत वैद्य पुष्कर नरहर प्रभू यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी साण्डू फार्मास्युटिकल्स लिमिटेडचे संचालक श्री. शशांक साण्डू यांनी कंपनीचा १२५ वर्षांचा समृद्ध आयुर्वेदीय वारसा, विश्वासार्हता आणि समाजासाठीचे योगदान यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमात वैद्य पुष्कर प्रभू यांच्या दीर्घकाळाचा आयुर्वेद सेवाकार्याचा वारसा जोपासल्याबद्दल सन्मान करण्यात आला. या प्रसंगी डॉ. नागेश सांडू (संचालक), श्री. घनश्याम सांडू (संचालक), सौ. विद्या पुष्कर नरहर प्रभू आणि श्री. शशांक सांडू (संचालक), सांडू फार्मास्युटिकल्स हे उपस्थित होते.

साण्डू म्हणाले, वैद्य पुष्कर प्रभू यांनी आपल्या वडिल आदरणीय वैद्य नरहर प्रभू यांचे आयुर्वेद क्षेत्रातील कार्य समर्थपणे पुढे चालवले आहे. आज चौथी पिढी त्यांच्या रूपाने हा वारसा पुढे नेत आहे. दादर येथील प्रभुवेद चिकित्सालयमार्फत ते अनेक रुग्णांना निसर्गाधारित उपचार देत असून, विशेषतः कर्करोग व्यवस्थापनातील त्यांच्या संशोधनात्मक कार्याचा आम्हाला अभिमान आहे.



आयुर्वेदाविषयी बोलताना साण्डू म्हणाले, आयुर्वेद हे केवळ औषधशास्त्र नाही, तर जीवनशैली आहे. धन्वंतरी पूजनाच्या या मंगल क्षणी साण्डू परिवार आरोग्यवर्धन आणि आयुर्वेदीय वारशाच्या संवर्धनासाठी कटिबद्ध असल्याचे आम्ही पुन्हा अधोरेखित करतो.

श्री. साण्डू यांनी पुढे सांगितले, साण्डू फार्मास्युटिकल्सचा प्रवास १२५ वर्षांहून अधिक काळाचा आहे. १८९९ साली आमचे संस्थापक स्वर्गीय वैद्य दत्तात्रय कृष्ण साण्डू आणि त्यांच्या ४ भावंडांनी याची मुहूर्तमेढ रोवली आणि प्राचीन आयुर्वेदाचे ज्ञान विज्ञानाधिष्ठित पद्धतीने समाजापर्यंत पोहोचविण्याचे ध्येय ठेवले. त्यानंतर साण्डू परिवाराने पारंपरिक ग्रंथांवर आधारित पण आधुनिक गुणवत्ता मानकांनुसार तयार केलेली सुरक्षित आणि परिणामकारक औषधे लोकांसाठी उपलब्ध करून दिली.

ते म्हणाले, आजच्या काळात काही निकृष्ट औषधनिर्मितीमुळे लोकांमध्ये निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर आयुर्वेदिक औषधे ही एक विश्वासार्ह, नैसर्गिक आणि सुरक्षित पर्याय ठरत आहेत. साण्डू फार्मास्युटिकल्स लिमिटेडने नेहमीच शुद्ध घटक, शास्त्रोक्त प्रक्रिया आणि काटेकोर गुणवत्ता नियंत्रण यांचा अवलंब केला आहे हेच आमचे सर्वात मोठे बळ आहे.

यानंतर वैद्य पुष्कर प्रभू यांनी उपस्थिताना मार्गदर्शन करून आयुर्वेद हे आपले शास्त्र जगाचे आरोग्य जपण्याचे कार्य करू शकते, यासाठी याचा प्रसार आणि प्रचार तसेच संतुलित जीवनशैलीचा दैनंदिन जीवनात कसा उपयोग करावा याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच आयुर्वेदीय उपचार कॅन्सर चिकित्सेत कशी प्रभावी भूमिका बजावू शकतो याची चर्चा त्यांनी केली.

वैद्य पुष्कर प्रभू यांनी पुढे सांगितले, एक रिसर्च रिपोर्ट नुसार भविष्यात भारतात दर १० व्या मनुष्यास कॅन्सरची लागण होण्याची शक्यता नाकारता येत नाही . या पार्श्वभूमीवर आयुर्वेद औषध निर्माता कंपन्यांनी कर्करोगावरील औषधांचे संशोधन करावे याला शासनाकडून आर्थिक पाठबळ लाभावे हि काळाची गरज आहे. हे संशोधन अखंड मानवजातीच्या सुरक्षित आरोग्यासाठी मैलाचा दगड सिद्ध होईल. कॅन्सर सारखा भस्मासुरावर आयुर्वेदीय चिकित्सापद्धती ब्रम्हास्त्र ठरू शकते असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .

साण्डू फार्मास्युटिकल्स लिमिटेडची औषधे तसेच आयुर्वेदीय रसायने रोगप्रतिरोधक क्षमता वाढविण्यात आणि शरीराचे आरोग्यदायी संतुलन राखण्यात अत्यंत उपयुक्त ठरली आहेत. याबाबत श्री. साण्डू म्हणाले, ही औषधे समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचावीत, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. वैद्य समुदायाकडून मिळणारे मार्गदर्शन आणि सहकार्य आमच्यासाठी प्रेरणादायी आहे.

## डब्ल्यूएच-१000एक्सएम६ सह सोनी इंडियाने नॉइज कॅन्सलिंगचे अत्याधुनिक तंत्रज्ञान सादर केले आहे

**नवी दिल्ली, :** सोनी इंडियाने आज डब्ल्यूएच-१००० एक्सएम६ वायरलेस नॉइज कॅन्सलिंग हेडफोन्सची घोषणा केली. ही त्यांच्या पुरस्कार विजेत्या १००० मालिकेची नवीनतम आवृत्ती आहे, जी प्रीमियम ऑडिओ आणि उत्तम श्रवणीय अनुभव देते. १००० मालिकेच्या समृद्ध वारशावर आधारित, हे नवीन मॉडेल संगीत प्रेमी, फॅशनिस्टा, प्रवासी आणि व्यावसायिकांसाठी एक अतुलनीय ऑडिओ सोल्यूशन आहे. यात अत्यंत सुरेख असे डिझाइन दमदार आवाज ऐकवण्यासोबतच सर्वोत्तम नॉइज कॅन्सलिंगची१ सोय करते.



प्रगत प्रोसेसर आणि अ‍ॅडॉप्टिव्ह मायक्रोफोन सिस्टमचे पाठबळ असलेल्याडब्ल्यूएच-१०००एक्सएम६ वर रिअल टाइममध्ये नॉइज कॅन्सलिंग ऑप्टिमाइझ केले जाते. ज्यायोगे तुम्हाला अनावश्यक आवाज येत नाही आणि तुम्ही करत असलेल्या गोष्टीचा अधिक आनंद मिळतो. याच्या प्रोसेसरचा वेग आधीच्या उत्पादनापेक्षा तब्बल सात पटींनी जास्त आहे. तर यापूर्वीच्या डब्ल्यूएच-१०००एक्सएम५ च्या तुलनेत याचा एचडी नॉइज कॅन्सलिंग प्रोसेसर ३ १२मायक्रोफोन्सना फाइन-ट्यून करतो. हे प्रमाण डब्ल्यूएच-१०००एक्सएम५ पेक्षा १.५ पट जास्त आहे. रिअल टाइमचा विचार करता नॉइज कॅन्सलिंग आणि आवाजाच्या गुणवत्तेत ही फार मोठी झेप आहे. बारा ठिकाणी असलेल्या मायक्रोफोन्सचा अचूक शोध घेत नॉइज कॅन्सलेशन करत तुमच्या आणि तुमच्या वातावरणाशी अधिक अचूकपणे जुळवून घेतो. मग तुम्ही प्रवासात आजूबाजूला असलेला आवाज रोखण्याचा प्रयत्न करत असाल किंवा मग ऑफिसमध्ये एकाग्रतेने काम करत असाल, तुम्हाला मिळणारा आवाजाचा अनुभव हा कोणत्याही अडथळ्याशिवाय आणि शक्तिशाली असेल.

सोनीचा नवीन अ‍ॅडाप्टिव्ह एनसी ऑप्टिमायझर कोणताही अनावश्यक आवाज तसेच हवेच्या दाबाशी जुळवून घेत आवाज रद्द करण्याची सुविधा देतो. शिवाय, विशेषत्वाने डिझाइन केलेले ड्रायव्हर युनिट कोणताही आवाज रद्द करण्यासाठी योग्य पद्धतीने ट्यून केलेले आहे.

रिअल टाइममध्ये तुमच्या सभोवतालच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी तसेच संगीत आणि बाह्य आवाज संतुलित करण्यासाठी ऑटो अँबियंट साउंड मोडची अधिक मदत होते. अनेक मायक्रोफोन आवाज फिल्टर करतात किंवा केवळ महत्त्वाच्या गोष्टीच ऐकवतात, मग त्या घोषणा असोत, कोणासोबतचे संभाषण असो किंवा मग आणखी काही. सोनी साउंड कनेक्ट ऍपमध्ये सेटिंग्ज स्वयंचलितपणे समायोजित करा किंवा त्यांना मॅन्युअली फाइन-ट्यून करा.

## आयडीबीआय बँक आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या तिमाहीचे वित्तीय निष्कर्श

**मुंबई, १९ ऑक्टोबर :** आज आयडीबीआय बँके तर्फे त्यांच्या आर्थिक वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीतील आर्थिक निष्कर्शांची घोषणा केली. वर्ष २६ च्या दुसऱ्या तिमाहीत निव्वळ नफा हा वार्षिक तुलनेत ९८ टक्क्यांनी वाढून तो रु ३,६२७ कोटींवर गेला आहे.

एनआयएम ची नोंदणी ३.७१ टक्के आणि व्याजातून मिळणारे निव्वळ उत्पन्न रु ३,२८५ कोटींवर गेले आहे. ठेवींवरील खर्च हा वर्ष २०२६ च्या दुसऱ्या तिमाहीत ४.६९ टक्के झाला असून वर्ष २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीत ही टक्केवारी ४.६५ टक्के होती. सीआरएआर मध्ये २५.३९ टक्के सुधारणा होऊन वार्षिक वाढ ही ३४१ बीपीएसची झाली आहे. मालमत्तेतून मिळारे उत्पन्न (आरओए) मध्ये १५८ बीपीएस ची वाढ ही २०२६ च्या दुसऱ्या तिमाहीत झाली, वर्ष २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीत ही टक्केवारी १.९७ टक्के होती तर रिटर्न ऑन इक्विटी (आरओई) २९.६४ टक्के झाली. ३० सप्टेंबर २०२४ रोजी निव्वळ एनपीए हे ०.२० टक्के होते ते ०.२० टक्के झाले. एकूण एनपीए हे २.६५ टक्क्यांवर पोहोचले जे ३० सप्टेंबर २०२४ रोजी ३.६८ टक्के होते. पीसीआर हे ९९.२६ टक्क्यांवर आले असून ३० सप्टेंबर २०२४ रोजी ही टक्केवारी ९९.४२ टक्के होती.

## झी रिश्तों का मेला च्या दिवाळी विशेष भागात झी टीव्हीच्या सिताऱ्यांनी मजेशीर अशा साडी नेसण्याच्या स्पर्धेत आणली रंगत!

**मुंबई, १९ ऑक्टोबर :** झी टीव्हीने नेहमीच अनोखे, भावस्पर्शी अनुभव निर्माण करण्यामध्ये आघाडी घेतली आहे. ते त्यांच्या कार्यक्रमांसह लोकांच्या जीवनात आनंद, एकत्रपणा आणि मनोरंजन आणतात. आपल्या नवीन ब्रँड वचन आपका अपना झी टीव्हीसह वाहिनीने मौज, भावना आणि उत्सवाचा आत्मा एकत्र करणारे क्षण प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे सुरू ठेवले आहे. या सणासुदीच्या काळात झी रिश्तों का मेला या कार्यक्रमाचे दिवाळी विशेष भाग हास्याने भरलेले होते आणि तुमचे आवडते कलाकार एका अनपेक्षित आणि मजेदार आव्हानाचा सामना करत या संध्येची रंगत वाढवत होते!




एका सेगमेंटमध्ये प्रेक्षकांची हसूनहसून पुरेवाट झाली जेव्हा जागृति एक नयी सुबहची धाडसी जोडी सूरज आणि आकाश, सरुचा मोहक वेद, जाने अनजाने हम मिलेचा ध्रुव आणि उत्साही होस्ट जय भानुशाली यांना तुम से तुम तकच्या गोपाळच्या खेळकर मार्गदर्शनाखाली स्वतः साडी नेसण्याचे आव्हान देण्यात आले. पुढे काय झाले ते तर पूर्णपणे मनोरंजनच होते, जिथे या मुलांनी निर्धाराने हास्याने भरलेल्या गोंधळासह साडी नेसण्याची कला आत्मसात करण्याचा प्रयत्न केला! ही मजा कशी उलगडली ते पाहण्यासाठी चित्रांवर स्वाइप करा!

जेव्हा ते साडी नेसण्याची कला आत्मसात करत होते तेव्हा जागृति एक नयी सुबहचा खोडकर कलिकांत मंचावर आला आणि त्याने या मुलांच्या साड्या सोडण्याचा प्रयत्न करून गोंधळ माजवला, ज्यामुळे प्रेक्षकांसह सर्वचजण जोरदार हसू लागले. हलके-फुलके संवाद आणि मैत्रीपूर्ण वातावरणामुळे हे दिवाळी स्पेशलमधील सर्वांत मनोरंजक क्षण बनले.

नंतर याच सुंदर साड्या त्या त्या शोच्या नायिकांना दिल्या गेल्या आणि अतिशय उत्सवपूर्ण आणि प्रेमळपणे या सेगमेंटचा समारोप झाला. पण ही स्पर्धा जिंकले तरी कोण?

## खास नात्यांचा धागा 'झी रिश्तों का मेला' मध्ये

**मुंबई, १९ ऑक्टोबर :** हल्लीच झालेल्या 'झी रिश्तों का मेला' या कार्यक्रमात वातावरण उत्साहाने भरलेले होते, हजारो चाहते आपल्या आवडत्या कलाकारांना भेटण्यासाठी आतुर होते. या कार्यक्रमात जे घडले, ते खरंच खास आणि हृदयस्पर्शी होते. कलाकार आणि प्रेक्षक यांच्यातील नाते फक्त पडद्यापुरते मर्यादित नसते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले कारण या भेटींमध्ये उमटलेले आनंदाचे आणि आपुलकीचे क्षण अगदी खरे, मनाला भिडणारे होते.



'तुम से तुम तक' या मालिकेतील पुष्पाची भूमिका साकारणाऱ्या सोमा राठोड यांना जेव्हा त्यांच्या चाहत्यांना भेटण्याची संधी मिळाली, तेव्हा एक हृदयस्पर्शी प्रसंग घडला. त्यांनी चाहत्यांसाठी ऑटोग्राफ दिले, सेल्फी काढल्या आणि प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधला.

या कार्यक्रमात 'जागृति एक नयी सुबह' या मालिकेतील दृढनिश्चयी आणि धैर्यवान नायिका जागृति (रचना मिस्त्री) हिच्याशी संबंधित एक प्रेरणादायी प्रसंगही घडला. एका लहान मुलीने तिच्याजवळ येऊन सांगितले की ती मोठी झाल्यावर जागृतिसारखी आयपीएस अधिकारी बनू इच्छिते.

'जाने अनजाने हम मिले' या मालिकेतील रीत (आयुषी खुराणा कक्कर) स्टेजवर आली तेव्हा वातावरण पूर्णपणे मनोरंजनाने भरले. एका चाहत्याने गिटार हातात घेत अपना बना ले पिया हे सुंदर गीत सादर केले.

# भारतातील पहिला डेटा सेंटर आयपीओ सिफी इन्फिनिटचा ३७०० कोटी रु. च्या आयपीओ साठी अर्ज सादर

**मुंबई, १९ ऑक्टोबर :** माहिती तंत्रज्ञान क्षमतेच्या दृष्टीने ३१ मार्च २०२५ पर्यंत 1Lattice आणि सी अँड वॉश अहवालानुसार भारतातील अग्रगण्य डेटा सेंटर कोलोकेशन सेवा पुरवठादारांपैकी एक सिफी इन्फिनिट स्पेसेस लिमिटेडने भारतीय सिक्युरिटीज आणि एक्स्चेंज बोर्ड (सेबी) कडे आपला ड्राफ्ट रेड हेअरिंग प्रोस्पेक्टस (डीआरएचपी) सादर केला आहे. कंपनीच्या प्राथमिक समभाग विक्री प्रस्तावात २,५०० कोटी रु. पर्यंतच्या इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू आणि कोटक डेटा सेंटर फंड (६४३ कोटी रु.) आणि कोटक स्पेशल सिच्युएशन फंड (५५७ कोटी रु.) या विक्री करणाऱ्या समभागधारकांकडून १,२०० कोटी रु. पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल यांचा समावेश आहे.

लागू असलेल्या कायद्यांनुसार, रेड हेअरिंग प्रोस्पेक्टस कंपनी रजिस्ट्रारकडे दाखल करण्यापूर्वी बुक रनिंग लीड मॅनेजर्स यांच्या सल्लामसलतीनुसार सिफी इन्फिनिट स्पेसेस ५०० कोटी रु. पर्यंतच्या आयपीओ पूर्व प्लेसमेंटचा विचार करू शकते. जर अशी प्री आयपीओ प्लेसमेंट करण्यात आली, तर त्यातून उभारलेली रक्कम फ्रेश इश्यू साईज मधून कमी केली जाईल.

कंपनी फ्रेश इश्यू मधून मिळालेल्या निव्वळ उत्पन्नाचा वापर पुढीलप्रमाणे करणार आहे: चेन्नई ०२ डेटा सेंटरमधील टॉवर बी च्या पूर्णतेसाठी आणि नवी मुंबईतील रबाळे डेटा सेंटरमधील टॉवर्स ११ आणि १२ च्या बांधकामासाठी अनुक्रमे ४६५ कोटी रु. आणि ८६० कोटी रु. इतक्या भांडवली खर्चाच्या अंशतः वित्तपुरवठ्यासाठी. या उत्पन्नातील काही भाग ६०० कोटी रु. च्या कर्ज परतफेडीसाठी वापरला जाईल, तर उर्वरित रक्कम सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरली जाईल.

१९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात खासगी इंटरनेट सेवा सुरू केलेला सिफी ग्रुपचा एक भाग आणि सिफी टेक्नॉलॉजीजद्वारे प्रवर्तित सिफी इन्फिनिट स्पेसेस ही भारतातील अग्रगण्य डेटा सेंटर इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी असून कोलोकेशन, इंटरकनेक्शन, बिल्ड-टू-सूट आणि व्हॅल्यू डेड सेवा आपल्या राष्ट्रीय नेटवर्कवर सादर करते.

ग्रुपच्या नेटवर्क, डेटा सेंटर आणि डिजिटल सेवांमधील ३ दशकांच्या अनुभवाचा लाभ घेत, कंपनी ग्राहकांच्या गरजेनुसार सुरक्षित, शाश्वत आणि ऊर्जा-कार्यक्षम डिजिटल पायाभूत उपाय सुविधा पुरवते. ३१ मार्च २०२५ पर्यंत, भारतातील बिल्ट आयटी क्षमतेनुसार कंपनीचा बाजारातील वाटा १५.२६% इतका होता.

वेगेसना अनंता कोटी राजू यांच्या नेतृत्वाखालील कंपनीने २००० मध्ये आपले पहिले डेटा सेंटरचे काम सुरू केले. भारतातील पहिल्या व्यावसायिक डेटा सेंटर्सपैकी हे एक होते. त्यांची हायपरकनेक्टेड इन्फ्रास्ट्रक्चर विविध प्रकारच्या वर्कलोड्सना पाठबळ देते. प्रत्येकाची रचना उच्च उपलब्धता, मजबूत सुरक्षा, स्केलेबल आर्किटेक्चर आणि हायपरस्केल तसेच एंटरप्राइज ग्राहकांसाठी शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी केली आहे.

३० जून २०२५ पर्यंत, कंपनीने सहा प्रमुख शहरे आणि मुंबई, चेन्नई, नोएडा, हैदराबाद, बंगळुरू आणि कोलकाता येथील मागणी केंद्रांमध्ये १४ कोलोकेशन डेटा सेंटर सुविधा चालवल्या. त्यांची एकत्रित बिल्ट आयटी पॉवर क्षमता १८८.०४ मेगावॅट (एमडब्ल्यू) आहे.

मुंबई (ऐरोळी) आणि बंगळुरू येथील डेटा सेंटर्स क्लाउड होस्टिंग (पब्लिक आणि हायब्रिड)साठी कार्यरत आहेत, तर नोएडा, हैदराबाद आणि कोलकाता येथील ठिकाणे प्रगत एअर, लिक्विड आणि इमर्शन कूलिंग सिस्टिमद्वारे समर्थित विस्तृत एंटरप्राइज वर्कलोड्ससाठी सेवा देतात.

आर्थिक वर्ष २०२३ ते आर्थिक वर्ष २०२५ दरम्यान, सिफी इन्फिनिटने ९५.४१ एमडब्ल्यू इतकी बिल्ट क्षमता वाढवली. ही कंपनीच्या इतर स्पर्धक कंपन्यांमध्ये सर्वाधिक आहे.

एसआयएसएल ५०० हून अधिक ग्राहकांच्या वैविध्यपूर्ण क्लायंट बेसला सेवा देते. डीआरएचपी मधील 1Lattice आणि सी अँड वॉश अहवालात नमूद केल्याप्रमाणे त्यात भारतात कार्यरत चार जागतिक Hyperscaler कंपन्यांपैकी तीन आणि आघाडीच्या दहा भारतीय बँकांपैकी सात (आर्थिक वर्ष २०२४ च्या महसुलावर आधारित) यांचा समावेश आहे.

कंपनीचे ग्राहक वित्तीय सेवा, फिनटेक, सोशल मीडिया, ओटीटी, उत्पादन, रिटेल आणि हेल्थकेअर यांसारख्या क्षेत्रांमध्ये पसरलेले आहेत. त्यासाठी डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर अत्यावश्यक आहे.

कंपनीने सातत्याने मजबूत आर्थिक कामगिरीचे प्रदर्शन केलेले आहे. आर्थिक वर्ष २०२३ मध्ये १०,२१३.४० दशलक्ष रु. इतका महसूल होता, जो आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १४,२८३.६५ दशलक्ष रु. झाला. यातून कंपनीची शाश्वत विकास गती दिसून येते. ईबीआयटीडीए आर्थिक वर्ष २०२३ मधील ४१२६.०६ दशलक्ष रु. वरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ६,३४२.४६ दशलक्ष रु. पर्यंत वाढला आणि ईबीआयटीडीए मार्जिन ४०.४०% वरून ४४.४०% पर्यंत सुधारले. करपश्चात नफा देखील आर्थिक वर्ष २०२३ मधील ९६६.८६ दशलक्ष रु. वरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १,२६३.६० दशलक्ष रु. पर्यंत वाढला.

डेटा सेंटर ही एक विशेष सुविधा असते जी संगणकीय मोजणी, स्टोरेज आणि नेटवर्किंग उपकरणे ठेवण्यासाठी तयार केली जाते. ही डिजिटल सेवांची भौतिक पायाभूत सुविधा असून त्यामुळे प्रचंड प्रमाणात डेटा साठवणे, प्रक्रिया करणे आणि त्याचे वहन करणे शक्य होते. भारतातील डेटा सेंटरची मागणी वेगाने वाढत असून, आर्थिक वर्ष २०२५-२०३० दरम्यान आयटी एमडब्ल्यू च्या दृष्टीने ३०.१-३५.१% सीएजीआर ने वाढण्याचा अंदाज आहे. देशाच्या डिजिटल परिवर्तनात डेटा सेंटर किती महत्वाची भूमिका पार पाडतात हे यातून अधोरेखित होते.

जे.एम. फायनान्शियल लिमिटेड, सी.एल.एस.ए. इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, जे. पी. मॉर्गन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कोटक महिंद्रा कॅपिटल कंपनी लिमिटेड आणि मॉर्गन स्टॅनली इंडिया कंपनी प्रायव्हेट लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

## आई विरुद्ध मुलगी: सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत सुंबुल खान आणि नेहा मेहताच्या व्यक्तिरेखांमध्ये संघर्ष ; कुटुंब दोन भागांमध्ये विभागले

**मुंबई, १९ ऑक्टोबर :** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेचे भावनांचे नानाविध स्तर उलगडून दाखवणारे कथानक आणि कौटुंबिक नाती यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. ही अन्विता (सुंबुल तौकीर खान) या तरुणीची कहाणी आहे, जी आपल्या विस्कळित कुटुंबाला सावरण्याची जबाबदारी निभावते आहे. अनेक वर्षे गायब राहिल्यानंतर तिची आई हेतल (नेहा एसके मेहता) आता अचानक परत आल्यामुळे कुटुंबाची शांतता गढूळली आहे. जुन्या जखमा पुन्हा वाहू लागल्या आहेत आणि अन्विताने जिवापाड जपलेली नाती तिच्या हातून निसटू लागली आहेत. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की, अन्विताचे जीवन हा भावनांचा चक्रवात झाला आहे. व्यसनी वडिलांशी म्हणजे सुहासशी (वरुण बडोला) झगडण्यापासून ते विराट (रजत वर्मा) ने लपवलेले सत्य पचवण्यापर्यंत विविध अडचणी तिच्या मार्गात आहेत. त्यात आता घरात एक नवीन समस्या उभी राहिली आहे. हेतल आपल्या गोड बोलण्याने जिंकून घेण्याचा प्रयत्न करत आहे, तर अन्विताला मात्र तिचा हा आपलेपणा खोटा असल्याचा दाट संशय आहे. आपल्या आईच्या हेतूंबद्दल ती साशंक आहे. हेतलचे वागणे, तिची प्रत्येक कृती अन्विताला खोटी वाटते. पण घरातील इतरांना मात्र आपल्या आईचे हे अस्सल प्रेम वाटते.

आगामी भागांमध्ये, आई आणि मुलीमधील दरी आणखी वाढत जाताना दिसेल. हेतलच्या खोटेपणावरून झालेल्या बोलाचालीत अन्विताला काही क्लेशदायक गोष्टी समजतात, पण जेव्हा तिची धाकटी भावंडे आपल्या आईची बाजू घेतात, तिला दुसरी संधी देण्याची गोष्ट करतात, तेव्हा परिस्थिती आपल्या हातून निसटत असल्याचा आभास अन्विताला होतो. आपला आतला आवाज आणि भावंडांचा आईवरील विश्वास यामध्ये अन्विता खूप एकटी आणि एकाकी झाली आहे.

आईबद्दल संशय घेणाऱ्या अन्विताला आपल्या भावंडांचा विश्वास गमवावा लागणार का? की अधिक उशीर होण्याआधी हेतलचा खरा चेहरा सगळ्यांसमोर येणार?

इत्ती सी खुशी मालिकेत अन्विताची भूमिका करणारी सुंबुल तौकीर खान म्हणते, अन्विताच्या जीवनातील हा टप्पा माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहे. अन्विता आत्ता प्रेम आणि अविश्वास यांच्या धूसर रेषेवर उभी आहे. आपल्या प्रिय व्यक्तीवर विश्वास ठेवावासा वाटत असताना त्या व्यक्तीच्या कृती मात्र त्या विश्वासाला पात्र नाहीत हे तिला दिसत आहे. अन्वितासाठी ही द्विधा स्थिती केवळ आपल्या आईच्या बाबतीत नाही; कुटुंब म्हणजे नक्की काय हा विचारही तिला सतावत आहे. हे क्षण भावनांचे ओझे घेऊन येतात पण हे देखील दाखवतात की, प्रेम आणि क्लेश कसे एकत्र असू शकतात.

## राशीभविष्य

**मेष :** आज कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेताना दूरदृष्टी ठेवा; घाई करणे योग्य नाही. जर तुम्ही कर्ज घेण्याची योजना आखली असेल तर तुम्हाला त्याबद्दल अधिक माहिती गोळा करण्याची आवश्यकता आहे.

**वृषभ :** आज तुम्ही दानधर्म आणि चांगल्या कामांकडे अधिक कल ठेवाल. दिवस व्यस्त असेल, परंतु तुमचे प्रयत्न तुम्हाला परिस्थिती सुधारण्यास मदत करतील. मित्राची मदत कठीण परिस्थिती कमी करेल.

**मिथुन :** व्यवसायात काही गुंतागुंत जाणवू शकते, परंतु तुम्ही कठोर परिश्रमाने त्या सोडवाल. कोणत्याही कामात स्वत:च्या निर्णयाला प्राधान्य द्या, इतरांच्या प्रभावाखाली येऊन स्वत:चे नुकसान करू नका.

**कर्क :** आज तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करण्याची योजना आखाल. तुमच्या कठोर परिश्रमाचे सकारात्मक परिणाम मिळतील. इतरांकडून तुमचे काम करून घेण्यातही तुम्ही यशस्वी व्हाल.

**सिंह :** आज, तुमच्या सर्व समस्या लवकरच सुटतील. सरकारी कामात तुम्हाला लक्षणीय फायदा होण्याची शक्यता आहे. आज मुलांसोबत तुमचा वेळ खूप छान जाईल. कामाची गुणवत्ता सुधारण्यावर भर द्या.

**कन्या :** आज तुमच्या कठोर परिश्रमाचे सकारात्मक परिणाम मिळतील, ज्यामुळे आत्मविश्वास वाढेल. तुम्हाला भावंडांची मदत घ्यावी लागू शकते. अनावश्यक कामांमध्ये वेळ वाया घालवू नका.

**तुळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. काही काळापासून असलेल्या ताणतणावापासून तुम्हाला आराम मिळेल. अनुभवी लोकांच्या सहवासात तुम्हाला काही सकारात्मक अनुभव मिळतील.

**वृश्चिक :** आजचा दिवस महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी चांगला आहे; तुम्हाला नवीन व्यवसाय कराराची ऑफर मिळू शकते. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत घरातील कामे पूर्ण करण्यात व्यस्त असाल.

**धनु :** ज्यांना स्थलांतर करण्याची इच्छा आहे त्यांची आज इच्छा पूर्ण होण्याची शक्यता आहे. तुमच्या सकारात्मक विचारसरणीमुळे तुमचे व्यक्तिमत्व वाढेल. कौटुंबिक, सामाजिक उपक्रमांमध्येही योगदान द्याल.

**मकर :** तुम्ही तुमची कामे पूर्ण मन लावून पूर्ण कराल आणि सामाजिक कार्यात तुमचा दर्जा टिकवून ठेवाल. अपूर्ण काम करण्यात मित्रांची मदत मिळेल. आज व्यवसायात सुव्यवस्था राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**कुंभ :** मागे पडलेली कामे पूर्ण करण्यात तुम्हाला यश मिळू शकेल. जर तुम्ही दुसरे काही काम सुरू करण्याचा विचार करत असाल, तर त्यावर चर्चा करून ती अंमलात आणण्याची हीच योग्य वेळ आहे.

**मीन :** आज, तुम्हाला अचानक उत्पन्नाचे नवीन स्रोत सापडतील, ज्याचा तुम्ही फायदा घेऊ शकाल. आज तुम्ही व्यस्त असाल, परंतु एखादा नातेवाईक किंवा मित्र तुमचे मनोबल वाढवण्यास मदत करेल.

## शब्दकोडे क्रमांक २२४४



**आडवे शब्द :-**
१) विशेष उल्लेखनीय हकिगत
६) भांडणे लावणारा
१०) नाशिवंत
११) पुरुष
१२) वेळ घालविणे, कालक्षेप
१३) कमळ
१५) चरण
१६) समोरासमोरची चकमक
१७) माप घेणे
१८) घाण
१९) मनुष्य
२०) तपस्या
२१) देवादिकास ओवाळताना म्हणावयाचे गीत
२२) च्या बरोबर
२३) दक्षता
२४) मौज, गंमत
२५) लक्ष वेधणारे, आकर्षित करणारे
२७) दुस-यावर चटकन विश्वास ठेवणारा
२८) अधिकाराचे स्थान
२९) मीठ
३१) कहाणी
३२) हलकट, दुष्ट
३३) बळकट, मजबूत
३५) लंकेचा राजा
३७) जिनसांची यादी
३८) मान खाली घातलेला
४०) गणेशाचे एक नाव
४२) अरण्य
४३) पाठविलेला
४५) दिवस
४७) भारतीय सैनिक, तरुण
४८) कप्पा, खण
५१) शत्रू
५३) घोड्याच्या पायाखाली लावण्याचे लोखंडी साधन
५४) गोमाता
५५) पहाऱ्याचे काम (हिं.)
५७) अष्टविनायकातील एक गाव
६१) उत्सवाचे दिवस
६२) रत्नाकर
६३) शत्रुच्या नाशाचे मंत्र तंत्र
६५) विषमच्या विरुद्ध
६७) कंजूष, गरीब
६९) सदन
७०) विधानसभेतील लोकप्रतिनिधी
७१) बसण्याची फळी
७२) नांगर
७३) आकाशयान
७४) मत्सर
७५) कणीदार पीठ

**उभे शब्द:-**
१) सत्तावीस मोत्यांची माळ
२) उर्ध्व दिशा
३) नम्रता
४) सिंह (हिं.), एक जुने वजनमाप
५) स्त्री
६) नौदल
७) प्रथम पूजनाचा मान असलेला देव
८) महाभारत रचणारे ऋषी
९) अंजनाचा एक प्रकार
१२) इच्छा
१४) रोमांच उभे करणारे, चित्तथरारक
१५) पर्जन्यकाळ
१६) वस्तू निर्मातीसाठी लागणारे उपकरण
२०) सामान्य
२१) आजोबा
२२) पाढ्यातील सहा
२४) हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा स्त्राव
२५) शपथ
२६) नाटक, चित्रपटाची थोडक्यात गोष्ट
२७) नसत्या उठाठेवी करणारी
२८) पुन्हा
२९) त्वरित, चटकन
३०) माराची उमटलेली खूण
३२) पाणी
३३) कलावंत
३४) खोदकाम
३५) योग्य, उचित
३६) च्या शिवाय
३९) माजलेला
४०) अकारण, उगाच
४१) मृत्युदेवता
४४) प्रहार, घाव
४६) समरभूमी
४७) शापद, पशू
४९) होडी चालविणारा
५०) झाडाचा पोकळ अंतर्भाग
५१) हत्ती
५२) खनिजाचे घर
५६) उत्तराधिकारी
५८) सोन्या-चांदीचा धागा
५९) आरडाओरड, ** वाजा
६०) संतोष, आनंद
६१) उत्सव
६२) भेग, चीर
६४) दारुचा एक प्रकार
६६) एक सुगंधी वनस्पती
६७) मेहेरबानी, दया
६८) कपोल
७०) कुंभाराची भट्टी.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | म | द | ग्री | ■ | गं | गा | ध | र | ■ | प | सा | य | दा | न |
| ग | र | वा | ■ | पा | गा | ■ | रा | ज | धा | नी | ■ | दी | ■ | र |
| र | ण | ■ | प | रा | ज | य | ■ | प | ■ | र | ग | ■ | ■ | ब |
| हा | ■ | का | रा | ■ | ल | क्ष | भो | ज | न | ■ | ड | र | का | ळी |
| टी | प | का | ग | द | ■ | ■ | ळ | ■ | ब | न | वा | स | ■ | ■ |
| ■ | ळ | ■ | ■ | म | ल | मा | स | ■ | स | ट | ■ | वा | सा | ■ |
| नि | वा | र | क | ■ | व | ■ | ट | ■ | सा | ■ | म | न | ग | ट |
| व | ट | व | ट | ■ | क | प | ■ | आ | या | रा | म | ■ | र | ■ |
| ड | ■ | ■ | क | स | र | त | ■ | रा | स | ■ | ■ | ना | पा | स |
| णू | ■ | क | ■ | ह | ■ | न | ■ | ध | ■ | सा | व | का | र | ■ |
| क | मा | ल | ■ | न | य | को | ट | ना | रा | य | ण | ■ | ■ | को |
| ■ | क | प | ब | शी | ■ | न | र | ■ | ज | ■ | वा | च | नी | य |
| आ | ड | ■ | क | ल | ता | ■ | फ | ट | क | ळ | ■ | रा | ■ | ■ |
| वा | ■ | हे | वा | ■ | त | मा | ल | ■ | वी | ■ | ना | च | ■ | मा |
| ज | स्त | ■ | स | डा | ■ | ती | ■ | जूं | ■ | स | म | र | भू | मी |



# तो इंजिन ऑईल पिऊन जगतो

जगात अनेक तऱ्हेची माणसं असतात. काही साधी-भोळी, काही खट्याळ तर काही अतरंगी. सोशल मीडियावरही अशा काही माणसांचे किस्से, फोटो, व्हिडीओ फिरत असतात. अलिकडेच कर्नाटकातून एक विचित्र प्रकरण समोर आले आहे. तिथे एका माणसाने आपल्या खाण्याच्या सवयींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. असा दावा केला जात आहे की, हा माणूस पोळी-भाजी, भात-आमटी असे सामान्य अन्न खात नाही तर तो इंजिन ऑइलवरच जगतो. 'इंजिन ऑइलवर जगणारा माणूस' अशीच त्याची ख्याती आहे. इंस्टाग्रामवर एक रील समोर आल्यावर त्या माणसाची गेल्या अनेक दशकांपासूनची ही जुनी सवय व्हायरल झाली आहे. विशेष म्हणजे, गेल्या तीस वर्षांपासून त्याच्या आहारात इंजिन ऑइलचा समावेश आहे. सोशल मीडिया पोस्टनुसार, कर्नाटकातील शिवमोगा जिल्ह्यातील रहिवासी असणारा हा माणूस आजूबाजूच्या परिसरात 'ऑइल कुमार' म्हणून ओळखला जातो. तो दररोज अंदाजे सात ते आठ लिटर इंजिन ऑइल पित असल्याचे सांगितले जाते. एवढंच नव्हे तर तो नियमितपणे चहाही पितो.

या पोस्टनुसार, अनेक दशके इंजिन ऑइल प्यायल्यानंतरही ऑइल कुमार यांना कधीही रुग्णालयात दाखल करावे लागले नाही किंवा त्यांना कधीही कोणत्याही आरोग्य समस्यांचा सामना करावा लागलेला नाही. असे जीवन भगवान अय्यप्पांच्या आशीर्वादामुळे मिळाल्याचा ऑइल कुमारांना विश्वास आहे. दैवी मदतीखेरीज अशा असामान्य आहारावर कोणीही जगणे शक्य नसल्याचा दावा ते करतात.

## कॅलिडोस्कोप

# व्हिसाशिवाय फिरा ५८ देश

भारतीय पासपोर्ट असेल तर तुम्ही ५८ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करु शकता. या देशांची यादी कमी लोकांना माहिती आहे. फक्त थायलंड आणि मलेशियासारख्या देशांमध्ये व्हिसामुक्त किंवा व्हिसा-ऑन-अरायव्हलसह भेट दिली जाऊ शकते, असे काहींना वाटते. मात्र हेन्ले पासपोर्ट इंडेक्स २०२५ नुसार, भारतीय नागरिक व्हिसाशिवाय ५८ देशांमध्ये प्रवास करू शकतात.

या यादीतील लोकप्रिय ठिकाणांमध्ये इंडोनेशिया, मॉरिशस, केनिया, मालदीव आणि थायलंड या देशांचा समावेश आहे. हे देश सुंदर लँडस्केप आणि संस्कृतीसाठी ओळखले जातात. शिवाय लाओस, मादागास्कर, फिजी आणि झिम्बाब्वे यासारखे देश अनोखा अनुभव देतात. इंडोनेशिया आणि थायलंड उत्कृष्ट सफारी आणि निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. फिजी आणि पलाऊ बेटे नैसर्गिक समुद्रकिनारे आणि विविध सागरी जीवनासाठी ओळखली जातात.

भूतान आणि नेपाळ हे अद्वितीय संस्कृती आणि परंपरा असणारे तसेच सहज पोहोचण्यायोग्य देश आहेत. ही वेगवेगळ्या खंडांवर स्थित देश आणि बेटांची यादी आहे. यापैकी काही लहान बेट देश आहेत तर काही आफ्रिका आणि आशियामध्ये आहेत. अंगोला, बुरुंडी, केनिया, मोझांबिक, नामिबिया, इथिओपिया, सोमालिया, टांझानिया, झिम्बाब्वे, सेशेल्स, मॉरिशस, मादागास्कर, सेनेगल, सिएरा लिओन, गिनी-बिसाऊ, जिबूती, केप वर्दे हे आफ्रिकेतील देश असून तिथे व्हिसाशिवाय जाता येते. आशियातील भूतान, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार, थायलंड, मलेशिया, मालदीव, इंडोनेशिया, इराण, कझाकस्तान, कंबोडिया, लाओस, मकाऊ (चीनचा भाग), कतार, जॉर्डन,




मंगोलिया, तिमोर-लेस्टे या देशांतही व्हिसाशिवाय जाता येते. कॅरिबियन समुद्रातील बार्बाडोस, डोमिनिका, ग्रेनाडा, हैती, जमैका, सेंट किट्स आणि नेव्हिस, सेंट लुसिया, सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स, त्रिनिदाद आणि टोबॅगो, मोंटसेराट (यूकेचा भाग), ब्रिटिश व्हर्जिन बेटावरही व्हिसाशिवाय जाता येते. पॅसिफिक महासागरातील (ओशनिया) लहान बेट देश म्हणजे फिजी, सामोआ, वानुआतु, तुवालू, किरिबाटी, मार्शल बेटे, मायक्रोनेशिया, पलाऊ, कुक बेटे, नियू, कोमोरोस बेटे तसेच भारताभोवती अनेक देश भारतीय नागरिकांना व्हिसा-मुक्त प्रवेश किंवा सोप्या प्रवेश प्रक्रिया देतात. त्यामुळे प्रवास करणे सोपे होते. नेपाळची भारताशी खुली सीमा आहे. त्यामुळे व्हिसा किंवा इतर कोणत्याही गुंतागुंतीच्या प्रक्रियेशिवाय थेट भेट देता येते. भूतानला व्हिसाची आवश्यकता नाही. फक्त प्रवेश परवाना आवश्यक आहे. तो सहज मिळू शकतो. श्रीलंका भारतीय नागरिकांना आगमनानंतर व्हिसा देते. काही देशात प्रवास करण्यापूर्वी 'इलेक्ट्रॉनिक ट्रॅव्हल ऑथोरायझेशन' (ईटीए) मिळवण्याची आवश्यकता असू शकते. आगमनानंतर व्हिसा आवश्यक असू शकतो. त्यासाठी पासपोर्ट परतीच्या तारखेपासून किमान सहा महिने वैध असणे आवश्यक आहे. व्हिसाशिवाय एखाद्या देशात प्रवास करत असाल, तर तेथे जास्तीत जास्त किती दिवस राहण्याची परवानगी आहे, हे मात्र तपासले पाहिजे.

# मित्र ही मिळतात भाड्याने

राज्याच्या काही भागांमध्ये एक नवीन प्रकारचे सोशल प्लॅटफॉर्म वेगाने लोकप्रिय होत आहे. 'फ्रेंड्स ऑन रेंट' असे त्याचे नाव असून यावर मैत्री निर्माण करण्यासाठी मित्र भाड्याने मिळत आहेत. हे मित्र ५० रुपये तास हा दराने काम करतात. ते तुमच्याबरोबर फिरायला जाण्यासाठी, कॉफी पिण्यासाठी, चित्रपट पाहण्यासाठी किंवा सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी तयार असतात. अशा प्रकारच्या मैत्रीच्या प्लॅटफॉर्ममुळे देशातील चिंता वाढली आहे.


'फ्रेंड्स अड्डा', 'फ्रेंड', 'पालमॅच' यासारखे ॲप्स फेसबुक आणि टेलिग्रामवर खूपच प्रसिद्ध आहेत. युजर्स या ॲप्सवरील प्रोफाइल्स ब्राउझ करतात. वय, भाषा किंवा आवडींनुसार मित्र फिल्टर करू शकतात आणि उपलब्धतेनुसार कोणालाही बुक करू शकतात. 'फ्रेंड्स ऑन रेंट' या ॲपचा ट्रेंड सध्या केरळमध्ये मोठ्या



प्रमाणावर पाहायला मिळत आहे.

या प्लॅटफॉर्म्सद्वारे फक्त मित्र पुरवले जातात. म्हणजेच या सेवा रोमान्स आणि सेक्स यांच्या पूर्णपणे विरोधात आहेत. या ॲपने स्पष्ट केले आहे, की कोणतेही याद्वारे सेक्स किंवा शारीरिक स्पर्श होणार नाही. कोणतेही वैयक्तिक प्रश्न विचारले जाणार नाहीत आणि कोणतीही खासगी जागा असणार नाही. ॲपवर बुक केल्यानंतर निवडलेला मित्र येतो, बुक केलेला वेळ घालवतो आणि निघून जातो.

केरळ विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख बुशरा बेगम यांनी सांगितले, की, हा ट्रेंड राज्यात वाढत्या शहरी एकटेपणाचे दर्शन घडवणारा आहे. सध्या तरुण घरापासून दूर जात आहेत. एकल कुटुंबांचा दर्जा खालावत आहे. कोणाकडेही वेळ उरलेला नाही. कामाच्या ओझ्याखाली मैत्री कमी होत आहे. अशा परिस्थितीत पैसे देऊन मैत्री करणे सोपे वाटू शकते; पण ही ती मैत्री नाही जी पैशांशिवाय फुलते. केरळमधील एका युजरने ऑनलाइन पोस्ट करुन यातील धोकेही दाखवून दिले आहेत. त्यावर गांभीर्याने विचार व्हायला हवा.



# हुंडा न घेणारं आदर्श कुटुंब

हुंड्याची कुप्रथा आजही अस्तित्वात आहे. लालसेपायी अधिकाधिक हुंडा घेतला जातो. घरच्या सुनेला त्रास दिला जातो. टोमणे मारले जातात. मात्र काही लोक या प्रथेला फक्त विरोधच करत नाहीत तर आपल्या कृतीतून समाजासमोर आदर्श निर्माण करतात. इंदूरमधलं फतेहचंदानी कुटुंब अशाच काही मोजक्या कुटुंबांपैकी एक. गेल्या ४५ वर्षांमध्ये या कुटुंबात सहा विवाह सोहळे संपन्न झाले. मात्र या कुटुंबाने सुनांकडून कधीही हुंडा घेतला नाही. लग्नाला येणाऱ्या पाहुण्यांकडून भेटवस्तूही स्वीकारल्या नाहीत. फतेहचंदानी कुटुंबात २१ सदस्य राहतात. एकत्रच स्वयंपाक करतात, एकत्रच जेवतात. या कुटुंबात घरी येणाऱ्या सुनेला लक्ष्मीचं रुप मानलं जातं. त्यामुळे मुलीच्या घरच्यांकडून हुंडा घेतला जात नाही. साखरपुड्यात मुलीकडून पाच किलो खडीसाखर आणि अकरा नारळ घेतले जातात. हाच काय तो त्यांचा हुंडा. या शिवाय दुसरी कोणतीही वस्तू स्वीकारली जात नाही. फतेहचंदानी कुटुंबियांना आदर्श मानून त्यांच्या समाजातल्या अनेकांनी हुंडा न घेण्याचा निर्णय घेतला आहे. ही खूप मोठी गोष्ट असल्याचं या कुटुंबाला वाटतं. समाजात बदल घडणं आवश्यक असल्याचं त्यांचं म्हणणं आहेय फतेहचंदानी कुटुंबाकडूनच सुनेला दागिने घातले जातात. लग्नाच्या पत्रिकेत भेटवस्तू न आणण्याची विनंती केली जाते. आजच्या काळात सुखाने नांदणारं एकत्र कुटुंब पहायला मिळत नाही. पण फतेहचंदानी कुटुंबाने एकत्र कुटुंबाची परंपरा जोपासली आहे. सुनेला लक्ष्मीचं रुप मानून योग्य तो मानसन्मान देणाऱ्या या कुटुंबाकडून समाजाने धडे घेणं गरजेचं आहे.

# बाळांची नावे ठेवण्यातून कमावते कोट्यवधी!

बाळाचं आगमन झाल्यानंतर कुटुंबात आनंदाचं आणि उत्साहाचं वातावरण पसरतं. बाळ जन्माला यायच्या आधी चर्चा असते ती म्हणजे मुलगा असेल तर काय नाव ठेवायचं आणि मुलगी असेल तर काय नाव ठेवायचं? भारतात बाळाचं नाव ठेवणं ही एक पारंपरिक बाब आहे. आजी-आजोबा किंवा पालक एकत्रितपणे मुलाचे नाव ठरवतात. त्यात धर्म, ज्योतिष आणि चालीरीती देखील महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु अमेरिकेतील एका महिलेने याच कामाला उत्पन्नाचं साधन बनवलं आहे. सॅन फ्रान्सिस्कोमध्ये राहणारी टेलर हम्फ्री नावाची महिला मुलांचे नाव सुचवण्यासाठी लाखो रुपये घेते. तिच्या कामाचे वैशिष्ट्य म्हणजे अद्वितीय, विशिष्ट आणि संस्मरणीय नावं सुचवणं. म्हणूनच श्रीमंत कुटुंबातील लोक बाळाला खास नाव देण्यासाठी तिच्याकडे येतात. न्यू यॉर्क पोस्टमधील एका वृत्तानुसार, टेलरने हे काम २०१८ मध्ये सुरू केलं. त्या वेळी ती फक्त १०० डॉलर्स (८,००० रुपये) मध्ये नावं सुचवत असे. त्यानंतर एका पार्टीतील उद्योजकांसोबत तिचं बोलणं झाल आणि त्या उद्योजकांनी महिलेला कामाचा दर वाढवण्यास सांगितले. पुढील काळात सुप्रसिद्ध 'न्यूयॉर्कर' मासिकात टेलरची कथा




प्रकाशित झाल्यानंतर तर कामाचा प्रचंड ओघ सुरू झाला. बघता बघता तिचा हा छोटासा उपक्रम एका मोठ्या व्यवसायात रूपांतरित झाला.

आता नवजात बालकांना खास नाव सुचवण्यासाठी टेलर प्रचंड मानधन घेते. भारतीय चलनात मोजायचे तर ही किंमत१७ हजार रुपयांपासून २७ लाख रुपयांपर्यंत असू शकते. कोणी लहान पॅकेज घेत असेल तर टेलर ईमेलद्वारे काही नावे सुचवते; पण मोठे पॅकेज घेणाऱ्यांसाठी ती बरीच माहिती गोळा करते. ती कुटुंबाच्या मूळ देशाबद्दल, त्यांच्या परंपरांबद्दल, इच्छांबद्दल विचारून बाळाचं नाव ठरवते. आई-वडिलांमध्ये नावावरून मतभेद असल्यास टेलर एक नाव निश्चित करण्यासाठी देखील मदत करते.

# असाही योगायोग...

भारतात येणारे राजकीय नेते ताज महालला भेट देतात. ताज महाल हे प्रेमाचं प्रतीक. सौंदर्याची खाण. म्हणूनच हा संगमरवरी ताज महाल अनेकांना भुरळ घालतो. ताज महाल प्रेमाचं प्रतीक असलं तरी या ऐतिहासिक ठिकाणाला भेट देणाऱ्या राजकीय नेत्यांचं तसंच काही प्रसिद्ध व्यक्तींचं लग्न मोडल्याच्या घटना घडल्या आहेत! अर्थात हा एक योगायोग म्हणता येईल. २००० मध्ये रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतीन आपल्या पत्नीसोबत ताज महाल पहायला गेले. मात्र तीन वर्षांनंतर त्यांचा घटस्फोट झाला. १९९२ मध्ये प्रिन्सेस डायना यांनी ताज महालला भेट दिली. त्यावेळी प्रिन्स चार्ल्स त्यांच्यासोबत नव्हते. प्रिन्स चार्ल्सच्या अनुपस्थितीबाबत त्यांना काही प्रश्नही विचारण्यात आले. मात्र यानंतर दहा महिन्यांनी डायना आणि प्रिन्स चार्ल्स यांचा घटस्फोट झाला. हॉलिवूड अभिनेता टॉम क्रूज २०११ मध्ये भारतात आला होता. टॉम क्रूज अनिल कपूरसोबत ताज महाल बघायला गेला होता. मात्र २०१२ मध्ये त्याने तिसरी पत्नी कॅटी होम्सशी घटस्फोट घेतला. २००९ मध्ये हॉलिवूड स्टार रसेल ब्रांड ताज महाल बघायला आला होता. त्याच्यासोबत प्रेयसी कॅटी पेरीसुद्धा होती. नंतर या दोघांनी लग्न केलं. पण १४ महिन्यांनी त्यांचा घटस्फोट झाला. २०१२ मध्ये प्रसिद्ध टेनिसपटू बोरिस बेकर पत्नी लीलीसह ताज महाल बघायला आला होता. मात्र नंतर त्यांचा घटस्फोट झाला. १९६२ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती जॉन एफ. केनेडी यांच्या पत्नी जॅकलीन केनेडी भारत दौऱ्यावर आल्या होत्या. या दौऱ्यात त्यांनी ताज महाल बघितला. मात्र यानंतर १९६३ मध्ये केनेडी यांची हत्या झाली आणि जॅकलीन एकट्या पडल्या.



# श्रीमंतानी टाकलेल्या वस्तू विकून ती झाली श्रीमंत!

नकोशा असल्याने टाकलेल्या वस्तूंचे भंगार उचलून कोणी श्रीमंत बनू शकतो का ? ही गोष्ट आश्चर्यकारक असली तरी खरी आहे. एका महिलेने टाकाऊतून टिकाऊ वस्तू तयार करत श्रीमंती गाठली आहे. या महिलेने लोकांनी टाकून दिलेले जुने सामान रिपेअर करून



महागड्या किंमतीत विकण्यास सुरुवात केली.

या अमेरिकन महिलेने अलिकडेच त्यांची कहाणी जगाला सांगितली. टेक्सासमध्ये राहणाऱ्या ३० वर्षीय मॅगी मॅकगॉ यांनी कधी विचार केला नसेल, की दुसऱ्याने टाकलेल्या वस्तूंमुळे त्यांचे भविष्य बदलेल. आज मॅगी टिकटॉक स्टार आहेत. टिकटॉकवर त्यांचे १९ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. त्यांना ४.५ कोटीहून अधिक लाईक्स मिळाले आहेत. मॅगी जुने फर्निचर तसेच रस्त्याच्या कडेला पडलेल्या वस्तू उचलून घरी आणतात आणि त्याला नवे रुप देतात. या वस्तू विकून त्या बक्कळ पैसे कमावत आहेत.

मॅगी यांना २०२० मध्ये आर्थिक तंगीचा सामना करावा लागला. त्या वेळी त्यांनी रस्त्याच्या कडेला टाकलेले जुने टेबल उचलून घरी आणले आणि आवश्यक ती दुरुस्ती, डागडुजी करुन आकर्षक कलर लावला. त्या म्हणतात की, त्याआधी हातात कधी पेंट ब्रशदेखील घेतला नव्हता न कोणते पॉवर टूल वापरले होते. त्या स्वत:ला कधीच क्रिएटीव्ह वगैरे मानत नव्हत्या. परंतु यानंतर त्यांचे आयुष्य बदलले. काही वेळा त्या दोन तासात श्रीमंत परिसरातून ६०० डॉलर (सुमारे ५०,००० रुपये) पर्यंतचे सामान एकत्र करतात.

# तो सहज पचवतो जंक फूड

फ्रेंच फ्राईज, हॉट डॉग, बर्गर, पिझ्झा हे पदार्थ आरोग्यासाठी हानिकारक मानले जातात. यांची गणना जंक फूडमध्ये केली जाते. हे जंक फूड कधी तरी खाणं ठिक आहे. पण आपण दररोज हे पदार्थ खायला सुरूवात केली तर... या पदार्थांचे दुष्परिणाम शरीरावर दिसून येतील. कोलेस्टरॉल, हृदयविकार, उच्च रक्तदाब, स्थूलपणा, मधूमेह अशा असंख्य विकारांना हे जंक फूड कारणीभूत ठरतं. पण बेल्जियमच्या फ्लेमिश ब्रेबेंट प्रांतातल्या स्केफेनमध्ये राहणारा रूडी गिबेल्स ३२ वर्षांपासून दररोज रात्री जेवणात फक्त फ्राईज आणि बर्गर खातो. रूडी ४५ वर्षांचा आहे. विशेष म्हणजे तो निरोगी आहे. त्याला जीवनशैलीशी संबंधित कोणताही आजार नाही. रूडी बेल्जियममध्ये खूप लोकप्रिय आहे. अनेक वृत्तपत्रांनी त्याला 'द अल्टीमेट बेल्जियन'चा किताबही दिला आहे. रूडीला फास्ट फूडचं व्यसन जडलं आहे. फास्ट फूडशिवाय आपल्याला दुसरं कोणतंही व्यसन नसल्याचं रूडी सांगतो. दोन वर्षांपूर्वी रूडी फ्लूने आजारी होता. त्या काळात बाजारातून फ्राईज आणि हॉट डॉग आणणं त्याला जमलं नाही. फक्त एवढाच काळ त्याने दुसरं अन्न खाल्लं. लहानपणी रूडीची आई त्याला आरोग्यदायी फळं आणि भाज्या खायला द्यायची. मग रात्री त्याला आवडीचे पदार्थ मिळायचे. रूडीला फ्राईज आणि हॉट डॉग आवडू लागले. मग त्याला या पदार्थांची सवय लागली. रूडीला जंक फूडचा त्रास झाला नसला तरी हा फक्त अपवाद असल्याचं डॉक्टरांचं म्हणणं आहे. प्रत्येकाच्या बाबतीत असं घडू शकत नाही. त्यामुळे कोणीही असला प्रयोग करून बघू नये, असं डॉक्टरांचं म्हणणं आहे.




# लक्झम्बर्गला या, बिनधास्त फिरा

राजधानी दिल्लीत महिलांना बसमधून मोफत प्रवास करता येतो. यासोबतच काही राज्यांमध्ये महिलांना सवलतीत तिकिट दिलं जातं. महिलावर्गाला खूश करण्यासाठी राजकारणी अशा विविध सवलती आणि योजनांची घोषणा करतात. मात्र लक्झम्बर्ग या देशातली सार्वजनिक वाहतूक सर्वांसाठी मोफत करण्यात आली आहे. तुम्ही महिला असा वा पुरुष, सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करण्यासाठी तुम्हाला एकही पैसा खर्च करावा लागणार नाही.

ट्रेन, ट्राम तसंच बसमधून प्रवाशांना मोफत फिरता येईल. लक्झम्बर्गचे नागरिकच नाहीत तर इथे येणाऱ्या पर्यटकांनाही या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. म्हणजेच लक्झम्बर्गमध्ये येणारे पर्यटक सगळीकडे मोफत फिरू शकतील. लक्झम्बर्ग हा युरोप खंडातला सातव्या क्रमांकाचा सर्वात लहान पण श्रीमंत देश आहे. हा देश खूप सुंदर आहे. इथे पर्यटकांचा राबता असतो. एक मार्च २०२० पासून इथे प्रवाशांना मोफत फिरता येणार आहे. २०१८ च्या अखेरीस झेवियर बेटल यांनी लक्झम्बर्गच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. निवडणूक प्रचारादरम्यान त्यांच्या पक्षाने मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचं आश्वासन दिलं होतं. या आश्वासनानुसार सरकार मोफत प्रवास योजना लागू करणार आहे. सरकारच्या




या निर्णयाचा लाभ लक्झम्बर्गचे सहा लाख नागरिक, एक लाख ७५ हजार मजूर आणि वर्षभरात लक्झम्बर्गला येणाऱ्या १२ लाख प्रवाशांना होणार आहे. सार्वजनिक वाहतूक सेवा मोफत उपलब्ध करून दिल्यामुळे गाड्यांची गर्दी कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अधिकाधिक नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा लाभ घ्यावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिक वापर केल्यास प्रदूषणाचं प्रमाणही कमी होईल. लक्झम्बर्गमध्ये गाड्यांची संख्या प्रचंड आहे. इथली जवळपास ६० टक्के जनता प्रवासासाठी वैयक्तिक गाड्यांचा वापर करते. मात्र ताज्या निर्णयामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या वापराला प्रोत्साहन मिळणार आहे.

# 'रंग दे नागपूर' स्पर्धेतील विजेत्यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित 'रंग दे नागपूर' या भव्य भित्तिचित्र स्पर्धेला नागपूरसह राज्यभरातील चित्रकारांनी भरभरून प्रतिसाद दिला. दोन दिवसांत शहराच्या भिंतींवर साकारलेल्या या कलाकृती साकारणाऱ्या कलावंतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित कार्यक्रमात महसूल तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार डॉ. परिणय फुले, आशिष देशमुख, कृपाल तुमाने, चरणसिंग ठाकूर, मोहन मते, संजय मेश्राम, सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांच्यासह सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, मनपाचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी., समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त श्रीमती सुकेशनी तेलगोटे, मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, क्रीडा अधिकारी डॉ पियूष आंबुलकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, स्पर्धेचे समन्वयक अभिजीत मौंदेकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांच्या देखरेखीत आयोजित या स्पर्धेचा उद्देश मनपाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचे आणि भविष्यातील 'स्वच्छ व स्मार्ट नागपूर'च्या स्वप्नांचे दर्शन कलेच्या माध्यमातून घडविणे हा होता.

या स्पर्धेत १८ वर्षांवरील विद्यार्थी आणि व्यावसायिक अशा दोन गटांत सहभाग घेण्यात आला. नागपूरसह मुंबई, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ, चंद्रपूर आणि वर्धा या जिल्ह्यांतून आलेल्या कलाकारांनी आपली कला सादर केली. एकूण ११८ गटांनी प्रवेशिका भरल्या होत्या, त्यापैकी मनपाने दिलेल्या संकल्पनेनुसार ९२ गटांच्या प्रवेशिका पात्र ठरल्या. प्रत्येक गटात ३ ते ५ चित्रकार होते, ज्यामुळे एकाचवेळी जवळपास तीनशेहून अधिक चित्रकारांनी नागपुरातील या रंगोत्सवात सहभाग नोंदवला.

चित्रकारांनी चार संकल्पनांवर आधारित भित्तीचित्रे साकारली यात नागपूर ॲट ७५: शहराचा अनेक दशकांतील विकास आणि परिवर्तनाचा प्रवास, 'स्वच्छ, हरित आणि स्मार्ट नागपूर': स्वच्छता, हिरवळ आणि स्मार्ट सिटीच्या विकासाचे चित्रण,नागपूरची संस्कृती, इतिहास आणि वारसा, 'नागपूर- द टायगर कॅपिटल ऑफ इंडिया' यांचा समावेश होता. चित्रकारांनी दीक्षाभूमीजवळील सुंदरलाल राय मार्ग (नीरी मार्ग) येथे, तर हौशी तसेच व्यावसायिक चित्रकारांनी सीताबडीर्तील फ्रिडम पार्क येथील भिंतीवर आपली कला रेखाटली.

नागपुरातील शासकीय चित्रकला महाविद्यालय, नटराज आर्ट अँड कल्चर कॉलेज, तसेच छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय चित्रकला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यात प्रमुख सहभाग घेतला. मनपाच्या या उपक्रमाचे कौतुक करून फडणवीस यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

### असे आहेत विजेते..

विद्यार्थी गट आणि व्यावसायिक गट अशा दोन्ही गटांतील विजेत्यांची पुरस्कार प्रदान करण्यातआले.

**: विद्यार्थी गट :**

चित्रकार क्रिश कटारिया व गट यांमी प्रथम पारितोषिक पटकाविले आहे. तर अनुराग मानकर व गट यांना द्वितीय, प्रतिक खापरे व गट यांना तृतीय, तर निसर्ग गाणकवार व गट आणि केशर पराटकर व गट यांना प्रोत्साहनपर पारितोषिक मिळविले आहे.

**: व्यावसायिक गट :**

चित्रकार शैलेश निंदेकर व गट यांनी प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले. तर नंदकिशोर सलवाटकर व गट द्वितीय, शैलेश बोंदले व गट यांना तृतीय तर अमित गोंनाडे व गट, सागर बावणे व गट यांना प्रोत्साहनपर पारितोषिक मिळविले आहे.

## २५ तासात १५ हजार ७७३ डोसे
# विष्णू मनोहरांचा नवा विश्वविक्रम



■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १९ :**
प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी गेल्या वर्षी नागपूर येथे केलेला सलग २४ तास डोसे वनविण्याचा स्वतःचाच विश्वविक्रम मोडला असून अमरावतीत त्यांनी न थांबता २५ तास डोसे तयार करण्याच्या नवीन विश्वविक्रमाला आज गवसणी घातली. शनिवारी सकाळी ७ वाजेपासून त्यांनी डोसे बनविण्यास सुरूवात केली होती. रविवारी सकाळी ८ वाजता या उपक्रमाची सांगता झाली. उपस्थितांनी टाळ्या वाजवून विष्णू मनोहर यांचे कौतूक केले.

हा उपक्रम अनुभवण्यासाठी अमरावतीकरांनी एमआयडीसी मार्गावरील गुणवंत लॉनवरील विष्णूजी की रसोईमध्ये मोठी गर्दी केली होती. २५ तासांमध्ये विष्णू मनोहर यांनी तब्बल १५ हजार ७७३ डोसे तयार केले. या विक्रमाची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडिया या संस्थांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात आली.

आजवर तीस विक्रमांची नोंद विष्णू मनोहर यांच्या नावावर असून, अमरावतीत नोंदवलेला हा त्यांचा एकतिसावा विक्रम आहे. पुढील विक्रम हा अमेरिकेत नोंदविण्याचा मानस विष्णू मनोहर यांनी व्यक्त केला असून ते त्या ठिकाणी सलग २६ तास डोसे बनवतील.

शनिवारी सकाळी ७ वाजेपासून या उपक्रमाला सुरूवात झाली होती. पहिल्या दोन तासांत सुमारे ७५० डोसे तयार झाले होते. पहिला तयार झालेला डोसा शेगाव येथील संत गजानन महाराज मंदिर येथे पाठविण्यात आला. हा विश्वविक्रम नोंदवताना विष्णू मनोहर यांना सुमारे ५०० किलो उडीद डाळ व तांदळाचे बॅटर आणि शंभर किलो चटणी लागली. तीन तव्यांवर एकाचवेळी त्यांनी डोसे तयार केले. यावेळी समोरील मंचावर गीत-संगीत कार्यक्रमाचे सादरीकरणही झाले.

याठिकाणी तयार होणारे डोसे हे निःशुल्क चाखायला मिळत होते. अमरावतीकरांना एकप्रकारे मेजवाणीच मिळाली. या उपक्रमाला अमरावतीकरांनी उत्तम प्रतिसाद दिल्याचे विष्णू मनोहर यांनी सांगितले. रात्री एक-दोन वाजता देखील सुमारे तीनशे अमरावतीकर माझा उत्साह वाढविण्यासाठी हजर होते. नवीन विश्वविक्रम नोंदवणे, हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे, असे ते म्हणाले.

# महासागरच्या दिवाळी विशेषांकाचे थाटात प्रकाशन



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
दैनिक महासागरच्या दिवाळी २०२५ या विशेषांकाचे आज रविवारी सायंकाळी विश्वप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्याहस्ते थाटात प्रकाशन झाले. विष्णू मनोहर यांनी आजच अमरावती येथे सलग २५ तास डोसे तयार करण्याचा नवा विश्वविक्रम करणे आणि आजच त्यांच्या हस्ते दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन होणे, हा दुर्मिळ योग ठरला.

यानप्रसंगी विष्णू मनोहर यांचे ज्येष्ठ बंधू प्रफुल्ल मनोहर, महासागरचे मुख्य संपादक तथा व्यवस्थापकीय संचालक श्रीकृष्ण चांडक, प्रबंध संपादक पंकज चांडक, सीईओ उमाशंकर लाल, पीआरओ कमल नामपल्लीवार, वितरण व्यवस्थापक पुरण शुंकर, वितरण विभागाचे राहुल गुडधे, निलेश लोणारे उपस्थित होते.

महासागरच्या दिवाळी विशेषांकातील भरगच्च आणि दर्जेदार साहित्यकृती, उत्कृष्ट छपाईची प्रशंसा करीत विष्णू मनोहर यांनी महासागर समुहाचे अभिनंदन केले. श्रीकृष्ण चांडक यांनी विष्णू मनोहर यांचे वडील आणि त्यांच्या मैत्रीचा उल्लेख करीत आठवणींना उजाळा दिला.

विष्णू मनोहर यांनी काही वर्षापूर्वी ५ फूट बाय ५ फूट आकाराचा पराठा बनवून पहिला विक्रम नोंदवला होता. त्यानंतर अनेक विक्रम त्यांच्या नावावर असून, आता तर स्वतःचेच विक्रम तोडत असल्याचे सीईओ युएस लाल म्हणाले.

# टिप्परच्या धडकेत दोघांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी गोंदिया, दि. १९ :**
गोंदिया-कोहमारा राष्ट्रीय महामार्गावर मुंडीपार ते मुरदोली दरम्यान टिप्परच्या धडकेत दुचाकीस्वार दोघांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवार १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास घडली. दिनेश अमरलाल पंधरे (३२) व देवेंद्र नेथूलाल उईके (३५) दोघेही राहणार बाघाटोला पोस्ट सावरी खुर्द जि. बालाघाट अशी मृतांची नावे आहे.

दोघेही नागपूर येथे रोजगारासाठी राहत होते. दिवाळी निमित्त रविवारी पहाटे ते दुचाकीने स्वगावी जाण्यासाठी निघाले असता विरुद्ध दिशेने येणाऱ्या टिप्परने धडक दिली. त्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच गोरेगाव पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व दोघांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले.

पोलिसांनी टिप्पर ताब्यात घेतले असून पुढील तपास पोलिस करीत आहेत. गोंदिया कोहमारा मार्गावर अवैध वाळूची वाहतूक नेहमीच होत असल्यामुळे या मार्गावर असे अपघात नेहमीच घडत असतात

**चालक जागीच ठार**

भरधाव टिप्परने समोरून येणाऱ्या टिप्परला धडक दिल्याने झालेल्या अपघातात चालक ठार तर एकजण जखमी झाला. ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत नागरा ते मोहरानटोली मार्गावर ही घटना घडली.

नितेश सुनील वैद्य (३४), रा. तिरोडा असे ठार झालेल्या चालकाचे नाव आहे, तर दुसरा टिप्पर चालक वीरेंद्र चैनलाल नागपुरे (३५), रा. सहेसपूर, ता. गोंदिया हा जखमी आहे.

# दिवाळीच्या काळात नागपुरात गोमांस विक्री

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १९ :**
दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर नागपूरजवळील बोरखेडी टोल नाक्याजवळील सर्पंच ढाबा ॲण्ड रेस्टॉरंट येथे अवैधरीत्या गोमांस विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर प्राणी कल्याण विभागाने मोठी कारवाई केली.

रविवारी सकाळी १० वाजता प्राणी कल्याण अधिकारी राम नंदनवार, पीपल्स फॉर ॲनिमल्स संस्थेच्या कार्यकर्त्या सुरभी लालवानी आणि बुटीबोरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक लाकडे यांच्या नेतृत्वाखाली या ढाब्यावर छापा टाकण्यात आला. छाप्यामध्ये सुमारे ३० ते ४० किलो गोवंश मांस जप्त करण्यात आले. या ढाब्याचे मालक फरुख खान यांच्यावर याआधीही तक्रारी होत्या.

# ऑस्ट्रेलियाची भारतावर मात

■ **वृत्तसंस्था, पर्थ, दि. १९ :**
भारतीय संघाने एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना ७ विकेट्सने गमावला. पावसाने प्रभावित झालेल्या सामन्यातील विजयासह ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. मालिकेतील दुसरा सामना २३ ऑक्टोबर रोजी ॲडलेडमध्ये खेळला जाईल.

पर्थच्या ऑप्टस स्टेडियमवर, ऑस्ट्रेलियाच्या बाजूने नाणे पडले आणि कर्णधार मिचेल मार्शने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कठीण परिस्थितीत, भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. १० षटकांच्या पॉवरप्ले-१ मध्ये संघाने २७ धावांत ३ विकेट्स गमावल्या. रोहित शर्मा ८ धावांवर आणि कर्णधार शुभमन गिल १० धावांवर बाद झाला.

विराट कोहली आपले खातेही उघडू शकला नाही. श्रेयस अय्यर ११ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. अक्षर पटेलने ३१ आणि केएल राहुलने ३८ धावा करून संघाचा स्कोअर १३६ वर नेला, परंतु डीएलएस पद्धतीने तो १३१ पर्यंत कमी करण्यात आला.

सुधारित लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने ते सहज साध्य केले. कर्णधार मिचेल मार्शने नाबाद ४६ धावा केल्या. तो डावाची सुरुवात करण्यासाठी आला आणि त्याच्या संघाला विजयाकडे घेऊन गेला.

# डॉ. पंजाबराव देशमुखांच्या जन्मगावात कृषी महाविद्यालय

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १९ :**
भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथे कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली. गत आठ वर्षांपासून हा प्रस्ताव प्रलंबित होता.

या संदर्भात भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा आमदार रणधीर सावरकर यांनी पाठपुरावा केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हा प्रश्न मार्गी लावला. या संदर्भात कृषी विभागाने शासन निर्णय निर्गमित केला असून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे संग्लनीत आणखी एक महाविद्यालय वाढले आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ येथे कृषी महाविद्यालय सुरू करण्याची जुनी मागणी होती. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी १९३२ मध्ये श्री शिवाजी एज्युकेशन संस्थेची स्थापना केली. ही मध्य भारतातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था असून २८९ शैक्षणिक संस्थांद्वारे शिक्षण दिले जाते.

पापळ येथे कृषी पदवी महाविद्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव आठ वर्षांपासून मंजुरीच्या प्रतीक्षेत होता. या प्रस्तावानुसार नवीन कृषी महाविद्यालय मंजुर होण्यासाठी आमदार रणधीर सावरकर यांनी शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यानंतर कृषी विभागाने महाविद्यालयावर मंजुरीची मोहर लावली. पापळ येथील जमिनीवर ६० विद्यार्थी प्रतिवर्ष प्रवेश क्षमता असलेले खासगी नवीन कृषी महाविद्यालय सुरू केले जाणार आहे.

# ...तर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना भोगावे लागेल!

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १९ :**
सरकारने शेतमालाच्या खरेदीची व्यवस्था न केल्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड नुकसान सहन करावे लागत आहे. शेतकऱ्यांना मारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे हे मुर्खात काढत असतील, तर त्यांना भोगावे लागेल, असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी दिला आहे.



कडू म्हणाले, दिवाळी तर बाजूलाच राहिली, शेतकऱ्यांचे आयुष्यच अंधारात आहे. अपुऱ्या मदतीत शेतकऱ्यांची दिवाळी कशी साजरी होईल, असा प्रश्न त्यांना विचारायचा आहे. तुमची दिवाळी दोन लाख रुपयांचे फटाके फोडून साजरी करता आणि शेतकऱ्याची दिवाळी पाच हजारात साजरी होऊ शकेल का, हा खरा सवाल आहे. सरकारला याविषयी थोडी लाज वाटायला हवी, पण असली तर वाटेल, अशी टीका त्यांनी केली.



■ ***नागपूर :*** *दिवाळी सणाला सुरूवात झाली असून, घरोघरी उजळलेल्या दिव्यांनी आसमंत प्रकाशात न्हावून निघतो आहे. घरासमोरच्या प्रांगणात काढल्या जाणाऱ्या रांगोळ्या, नटूनथटून आणि दागिणे परिधान करून महिलांचे सजणे ओघाने आलेच. दिवाळीच्या या उत्सवाला नागपूर शहरातही उधाण आल्याचे दिसून येत आहे.*

